cmyk

दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव ● लातुर जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–१९८ | गुरूवार दि.८ ऑक्टोबर २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय....

### पैसा वाढतोय, सुविधा का नाहीत?

महाराष्ट्रात विकासाच्या घोषणा मोठ्या आहेत. अर्थसंकल्प मोठे आहेत, योजनांचे आकडे मोठे आहेत आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून होणाऱ्या निधीच्या हस्तांतरणाचे आकडेही कोट्यवधींच्या पुढे गेले आहेत. पण या सगळ्या आकड्यांमधून सामान्य नागरिकाच्या आयुष्यात नेमका किती बदल झाला, हा प्रश्न मात्र अजूनही अनुत्तरित आहे. कारण रस्त्यावरील खड्डा, अनियमित पाणीपुरवठा, कचऱ्याचे ढीग आणि पावसात होणारा जलभराव यांना अर्थसंकल्पातील आकडे दिसत नाहीत; त्यांना प्रत्यक्ष काम दिसते.

## थोडक्यात...

### पश्चिम बंगालचे नाव 'पश्चिम बंग' होणार

कोलकाता: पश्चिम बंगालचे नाव बदलून 'पश्चिम बंग' करण्याची तयारी सुरू असल्याचे भाजपचे प्रदेशाध्यक्ष समिक भट्टाचार्य यांनी म्हटले आहे. या नावबदलासाठी राज्याच्या आगामी विधानसभा अधिवेशनात विधेयक आणले जाणार असल्याचा दावा त्यांनी केला आहे. मात्र, सध्या पश्चिम बंगालचे अधिकृत नाव बदललेले नाही. याबाबतची प्रक्रिया विधेयक आणि पुढील मंजुरीनंतरच पूर्ण होईल. 'बांग्ला', 'बंग' किंवा 'वेस्ट बंगाल' अशा वेगवेगळ्या नावांऐवजी एकच अधिकृत नाव असावे, अशी भाजपची भूमिका असल्याचे त्यांनी सांगितले. राज्याची ऐतिहासिक आणि सांस्कृतिक ओळख लक्षात घेऊन हा निर्णय घेतल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. समिक भट्टाचार्य यांच्या मते, १९४७ मध्ये भारताची फाळणी झाल्यानंतर बंगालचा एक भाग भारतात राहिला, तर दुसरा भाग पुढे बांगलादेश झाला.

### शक्तिपीठ महामार्गाची जबरदस्तीने मोजणी

पंढरपूर: पंढरपूरमध्ये शक्तिपीठ महामार्गाच्या मोजणीसाठी गावांमध्ये पोलिसांचा बंदोबस्त लावून जबरदस्तीने मोजणी करण्यात आली आहे. लोकांमध्ये, गावकऱ्यांमध्ये दहशत निर्माण केली जाते, लोकशाही असलेल्या देशांमध्ये अशा पद्धतीचे वर्तन योग्य नाही, अशा शब्दात राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते जयंत पाटील यांनी हल्लाबोल केला आहे. सरकारला याची किंमत मोजावी लागेल, असा इशारा सुद्धा त्यांनी दिला. जयंत पाटील म्हणाले की, सरकारला हे करण्याची गरज का पडते, शेतकऱ्यांसोबत संवाद का साधत नाहीत? सरकार वन साईड रेटारेटी करून सर्व करत आहे यामुळे सरकारची प्रतिमा मलीन होण्यास मदत होते. त्याची किंमत सरकारमध्ये बसलेल्या सगळ्यांना मोजावी लागेल. त्यांनी सांगितले की, ज्या भागातून शक्तीपीठ महामार्ग जातो त्या भागातील लोकप्रतिनिधींना देखील याची किंमत मोजावी लागेल. विकासकामाला आमचा विरोध नाही. मात्र, आधीपासूनच त्या ठिकाणी व्यवस्था असताना नवी व्यवस्था करणे हे योग्य नाही.

### मिथुन चक्रवर्ती पश्चिम बंगाल सरकारचे सल्लागार

कोलकाता: ज्येष्ठ अभिनेते मिथुन चक्रवर्ती यांची पश्चिम बंगालमधील मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी यांच्या नेतृत्वाखालील सरकारमध्ये सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. माहिती आणि सांस्कृतिक कार्य विभागामध्ये मिथुन चक्रवर्ती यांना कॅबिनेट मंत्री पदाचा दर्जा देण्यात आला आहे. राज्यातील भाजप सरकार बंगालच्या सांस्कृतिक आणि चित्रपट क्षेत्रावर विशेष भर देत असताना ही महत्त्वपूर्ण घोषणा करण्यात आली आहे. दिग्गज बंगाली अभिनेते उत्तम कुमार यांच्या जन्मशताब्दी वर्षाच्या कार्यक्रमादरम्यान मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी यांनी या नियुक्तीची अधिकृत घोषणा केली. बंगालचा समृद्ध चित्रपट वारसा जतन करणे आणि राज्याला पुन्हा एकदा प्रमुख सांस्कृतिक व चित्रपट केंद्र म्हणून प्रस्थापित करण्याच्या व्यापक प्रयत्नांचा हा एक भाग असल्याचे राज्य सरकारकडून सांगण्यात आले आहे. भारतीय चित्रपटसृष्टीतील एक अत्यंत लोकप्रिय आणि प्रसिद्ध चेहरा असलेले मिथुन चक्रवर्ती हे भाजपचे प्रमुख प्रचारक तसेच पश्चिम बंगालमधील पक्षाचा एक आघाडीचा राजकीय चेहरा राहिले आहेत.

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.०६ ऑक्टोबर २०२६**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|
| **गहू: ५३.५० क्विंटल** | | |
| २,७०० | ३,०६४ | २,८३६ |
| **ज्वारी/हायब्रिड: ९३.५० क्विंटल** | | |
| ३,२९० | ६,३९१ | ४,२९५ |
| **मका/लोकल: १.५० क्विंटल** | | |
| २,४३६ | २,४३६ | २,४३६ |
| **तूर : ३०.५० क्विंटल** | | |
| ९,००० | ९,७०१ | ९,४६० |
| **उडीद : १३.५० क्विंटल** | | |
| ८,३०० | ९,५२२ | ९,२५९ |
| **बाजरी: ८.५० क्विंटल** | | |
| २,३०० | २,८२० | २,६८०४ |
| २,६०० | | |
| **मुग: ७.०० क्विंटल** | | |
| २,४५२ ७,८०० | ८,३६० | ८,०८० |
| **सोयाबीन: १८७.०० क्विंटल** | | |
| ५,९०० | ९,२०० | ६,३९९ |
| **हरभरा: ७.०० क्विंटल** | | |
| ६,००१ | ७,०५१ | ६,६६३ |

# दुष्काळग्रस्त महाराष्ट्रासाठी केंद्राची मदतीची ग्वाही

## फडणवीसांची अमित शाह यांच्याशी भेट; ८ ते ११ ऑक्टोबरदरम्यान केंद्रीय पथकाची पाहणी

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**महाराष्ट्रातील गंभीर दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची नवी दिल्लीत भेट घेऊन राज्यासाठी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधी (एनडीआरएफ) अंतर्गत जास्तीत जास्त मदत देण्याची मागणी केली. या भेटीत राज्यातील दुष्काळाची तीव्रता, पिण्याचे पाणी, चारा आणि पिकांचे नुकसान याबाबत सविस्तर माहिती फडणवीस यांनी शाह यांच्यासमोर मांडली.**



फडणवीस यांनी भेटीनंतर माध्यमांशी बोलताना सांगितले की, केंद्रीय गृहमंत्री हे एनडीआरएफशी संबंधित प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावतात तसेच आंतरमंत्रालयीन गटाचे अध्यक्ष आहेत. महाराष्ट्राने दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर केंद्राकडे मदतीचा प्रस्ताव पाठविला असून, या प्रस्तावाची प्रत अमित शाह यांना देण्यात आली आहे. महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात दुष्काळ निर्माण झाला असून, आगामी काळात ▶▶ पान २ वर

### विशेष मदतीची मागणी

महाराष्ट्रातील दुष्काळाची व्याप्ती लक्षात घेता केंद्र सरकारने राज्याला विशेष मदत करावी, अशी मागणी आपण अमित शाह यांच्याकडे केली असल्याचे फडणवीस यांनी सांगितले. यावर अमित शाह यांनी सकारात्मक भूमिका घेतली असून, नियमांमध्ये बसणारी जास्तीत जास्त मदत महाराष्ट्राला करण्याचे आश्वासन दिल्याचे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, महाराष्ट्रातील ३५८ पैकी २६५ तालुके दुष्काळग्रस्त घोषित करण्यात आले आहेत. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारकडून पंचनामे आणि इतर मदत प्रक्रियेला वेग देण्यात येत आहे.

# राजधानी दिल्लीत बुधवारीही रणकंदन!

## राहुल गांधी पोलिसांच्या ताब्यात, 'इंडिया' आघाडीच्या खासदारांचा पोलिसांशी संघर्ष; प्रियांका गांधींचाही रस्त्यावर ठिय्या

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी आंदोलन करणाऱ्या 'इंडिया' आघाडीच्या खासदारांना जंतरमंतरकडे जाण्यापासून दिल्ली पोलिसांनी रोखले. यावेळी लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यासह अनेक विरोधी खासदारांना पोलिसांनी ताब्यात घेतले. राहुल गांधी यांना ताब्यात घेताना पोलिसांनी बळाचा वापर केल्याचा आरोप विरोधी खासदारांनी केला. या कारवाईमुळे जंतरमंतर परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले.**

विरोधी खासदारांना घेऊन जाणाऱ्या बसमधून राहुल गांधी स्वतः खाली उतरले आणि जंतरमंतरच्या दिशेने मोर्चाचे नेतृत्व करू लागले. मात्र, पोलिसांनी त्यांना अडवले. त्यानंतर राहुल गांधी यांनी



रस्त्यावरच ठिय्या देत आंदोलन केले. पोलिसांनी त्यांना तेथून हटविण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी वाहनात बसण्यास विरोध केला. अखेर पोलिसांनी त्यांना उचलून पोलिसांच्या वाहनात बसवले. 'इंडिया' आघाडीच्या खासदारांची मागणी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांची भेट घेऊन निवेदन देण्याची तसेच निवडणूक प्रक्रियेबाबत उपस्थित करण्यात आलेल्या प्रश्नांवर चर्चा करण्याची आहे. विशेषतः मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षणाच्या (एसआयआर) मुद्द्यावरून ▶▶ पान २ वर

### माझ्यावर १०० एफआयआर दाखल व्हावेत–राहुल गांधी

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आणि निवडणूक आयोगाच्या विरोधात विरोधी पक्षांनी केलेल्या निदर्शनांमुळे आपल्यावर आणि इतर खासदारांवर दिल्ली पोलिसांनी एफआयआर दाखल करण्याच्या निर्णयावर लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी बुधवारी कडक शब्दांत टीका केली. तसेच, आपण आणखी खटल्यांना सामोरे जाण्यास तयार असल्याचेही राहुल गांधी यांनी सांगितले. राहुल गांधी पुढे म्हणाले की, माझ्यावर ४५ एफआयआर दाखल झाले आहेत; मला वाटते की माझ्यावर १०० एफआयआर दाखल व्हावेत. प्रत्येक एफआयआर माझ्यासाठी एका पदकासारखा आहे.

### पोलिसांकडून मारहाण आणि लाठीचार्ज –खा.महुआ मोईत्रा

टीएमसी खासदार महुआ मोईत्रा म्हणाल्या, शांततापूर्ण निदर्शने करणाऱ्यांशी दिल्ली पोलीस ज्या क्रूरतेने वागत आहेत, ते तुम्ही पाहू शकता. ज्ञानेश कुमार यांनी राजीनामा दिलाच पाहिजे. आमचा दोष काय आहे? दिल्ली पोलिसांकडून कार्यकर्ते आणि सामान्य जनतेवर अशा प्रकारे निर्दयीपणे मारहाण आणि लाठीचार्ज का केला जात आहे? खासदारांना जंतर-मंतरवर जाण्यापासून का रोखले जात आहे? इथे नक्की काय चालले आहे.?

# एमपीएससी आंदोलन हायजॅक; ते पूर्णपणे राजकीय बनले- फडणवीस



दिल्ली । वृत्तसंस्था

**पुण्यातील एमपीएससी परीक्षार्थींचे आंदोलन हायजॅक झाले असून, त्याचे रूपांतर राजकीय आंदोलनात झाले आहे, असा आरोप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी केला. तसेच, विद्यार्थी शिष्टमंडळांनी मांडलेल्या सर्व मागण्या राज्य सरकारने मान्य केल्या होत्या, असेही त्यांनी ठामपणे सांगितले.**

दिल्लीत पत्रकारांशी बोलताना फडणवीस म्हणाले, विद्यार्थ्यांच्या १५ सदस्यांच्या शिष्टमंडळाने यापूर्वी राज्य सरकारकडे पाच मागण्या सादर केल्या होत्या आणि त्या सर्व मान्य करण्यात आल्या होत्या. या विद्यार्थ्यांचे आंदोलन हायजॅक झाले आहे. आता ते पूर्णपणे राजकीय नेत्यांचे आंदोलन बनले आहे. एमपीएससीशी संबंधित मुद्द्यांऐवजी आता विविध राजकीय मुद्द्यांवर भाषणे केली जात आहेत. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षांना पदावरून दूर करण्याचा अधिकार सरकारकडे नाही, कारण या घटनात्मक प्रक्रियेत ▶▶ पान २ वर

# पोलिसांनी परवानगी नाकारली; मात्र आंदोलन होणारच

## दिल्ली पोलिसांना सीजेपीचे थेट आव्हान, सहसंयोजक सौरव दास यांचा इशारा

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

कॉकरोच जनता पार्टीचे (सीजेपी) सहसंयोजक सौरव दास यांनी बुधवारी पत्रकार परिषद घेत दिल्ली पोलिसांनाच थेट आव्हान दिले. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी सीजेपीने १० ऑक्टोबर रोजी दिल्लीतील जंतर मंतरवर आंदोलनाची घोषणा केली आहे. या आंदोलनाला दिल्ली पोलिसांनी परवानगी नाकारली असली, तरी आंदोलन करण्यासाठी पोलिसांची परवानगी कशाला, असा सवाल दास



यांनी उपस्थित केला. सीजेपीकडून या आंदोलनाची औपचारिक सूचना दिल्ली पोलिसांना देण्यात ▶▶ पान २ वर

# विद्यार्थ्यांना आंदोलन करण्याचा अधिकार

## एमपीएससी विद्यार्थी आंदोलनप्रकरणी उच्च न्यायालयाची राज्य सरकारला फटकार

मुंबई । प्रतिनिधी

**सार्वजनिक भरती परीक्षा निष्पक्षपणे आणि कोणत्याही गैरप्रकारांशिवाय घेतल्या जातील, याची खात्री करणे हे राज्य सरकारचे कर्तव्य आहे, असे निरीक्षण मुंबई उच्च न्यायालयाने पुण्यात सुरू असलेल्या विद्यार्थी आंदोलनांबाबतच्या याचिकेवर सुनावणी करताना बुधवारी नोंदवले.**




महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) परीक्षांबाबत पुण्यात सुरू असलेल्या आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर दाखल करण्यात आलेल्या याचिकेवर सुनावणी करताना मुख्य न्यायमूर्ती महेश चंद्र त्रिपाठी आणि न्यायमूर्ती अद्वैत सेठना यांच्या खंडपीठाने ही निरीक्षणे नोंदवली. उच्च न्यायालयाने पुढे असे की सांगितले की, राज्य सरकारने हे आश्वासन दिले पाहिजे की, ज्या काही परीक्षा ▶▶ पान २ वर

# लोकप्रतिनिधी बांधावरून गायब!

बीड । विशेष प्रतिनिधी

**राज्यासह बीड जिल्ह्यात यंदा दुष्काळजन्य परिस्थितीने भीषण रूप धारण केले आहे. पावसाअभावी उभी पिके करपून गेली असून जनावरांच्या चाऱ्याचा आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. हवालदिल झालेला शेतकरी मदतीकडे डोळे लावून बसला असताना जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी मात्र या गंभीर परिस्थितीपासून पूर्णपणे दूर असल्याचे विदारक चित्र पाहायला मिळत आहे. निवडणुकीच्या काळात मतांसाठी शेतकऱ्यांच्या घराचे उंबरठे झिजवणारे नेते आता शेतकरी संकटात असताना बांधावर फिरकायलाही तयार नाहीत, असा तीव्र संताप ग्रामीण भागातून व्यक्त होत आहे.**



संपूर्ण जिल्ह्यात शेतकऱ्यांचे अश्रू पुसण्यासाठी कोणीही पुढे येत नसताना केवळ आष्टी-पाटोदा मतदारसंघाचे आमदार सुरेश धस यांनी दोन वेळा शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांच्या व्यथा जाणून घेण्याचा प्रयत्न केला. मात्र, दुष्काळग्रस्त भागातील त्यांच्या हेलिकॉप्टर दौऱ्यामुळे मदतीपेक्षा राजकीय चर्चा आणि टीकेलाच जास्त उधाण आले. दुसरीकडे, जिल्ह्यातील इतर सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींनी दुष्काळाकडे सपशेल पाठ फिरवल्याचे दिसत आहे. बीडचे खासदार बजरंग सोनवणे यांच्यासह आ.धनंजय ▶▶ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# पैसा वाढतोय, सुविधा का नाहीत?

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कारभाराचा खरा हिशेब नागरिकांना मिळणार कधी?

महाराष्ट्रात विकासाच्या घोषणा मोठ्या आहेत. अर्थसंकल्प मोठे आहेत, योजनांचे आकडे मोठे आहेत आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून होणाऱ्या निधीच्या हस्तांतरणाचे आकडेही कोट्यवधींच्या पुढे गेले आहेत. पण या सगळ्या आकड्यांमधून सामान्य नागरिकाच्या आयुष्यात नेमका किती बदल झाला, हा प्रश्न मात्र अजूनही अनुत्तरित आहे. कारण रस्त्यावरील खड्डा, अनियमित पाणीपुरवठा, कचऱ्याचे ढीग आणि पावसात होणारा जलभराव यांना अर्थसंकल्पातील आकडे दिसत नाहीत; त्यांना प्रत्यक्ष काम दिसते.

महाराष्ट्रात २२ जुलै २०२६ रोजीच्या राज्य निवडणूक आयोगाच्या आकडेवारीनुसार २९ महानगरपालिका, २४७ नगरपालिका, १४७ नगरपंचायती, ३४ जिल्हा परिषदा, ३५१ पंचायत समित्या आणि २७ हजार ७८२ ग्रामपंचायती आहेत. म्हणजेच राज्यातील जवळपास २८ हजार ग्रामपंचायती आणि शेकडो शहरी संस्था नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी थेट जोडलेल्या आहेत. स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजे केवळ निवडणुकीचे राजकारण नाही. त्या नागरिकांच्या दारात असलेल्या शासनाची पहिली पायरी आहेत. त्यामुळे प्रश्न साधा आहे–पैसा कमी आहे की त्याच्या वापराची व्यवस्था कमकुवत आहे? आकडे पाहिले तर निधीची कमतरता हे एकमेव कारण म्हणता येणार नाही. २०२३–२४ मध्ये महाराष्ट्राने स्थानिक स्वराज्य संस्थांना तब्बल ९५ हजार २१८ कोटी रुपये हस्तांतरित केले. त्यापैकी ४२ हजार ४६३ कोटी ग्रामीण आणि ५२ हजार ७५५ कोटी रुपये शहरी स्थानिक संस्थांना मिळाले. हे हस्तांतरण त्या वर्षातील राज्याच्या महसुली प्राप्तीच्या सुमारे २२ टक्के होते.

याहून महत्त्वाचे म्हणजे कॅगच्या २०२४–२५ च्या अहवालानुसार स्थानिक संस्था व इतर संस्थांना दिलेली आर्थिक मदत २०२३–२४ मधील १३ हजार ८१७.९६ कोटी रुपयांवरून २०२४–२५ मध्ये १९ हजार २८१.७३ कोटी रुपयांवर पोहोचली. ही सुमारे ३९.५४ टक्क्यांची वाढ आहे. महानगरपालिका व नगरपालिकांना मिळणारी मदत २ हजार ८०६.६९ कोटींवरून ४ हजार ३३८.११ कोटी, तर जिल्हा परिषद व अन्य पंचायतराज संस्थांना मिळणारी मदत ७ हजार ३१३.६५ कोटींवरून ११ हजार ९.९३ कोटी रुपये झाली. मग प्रश्न पुन्हा तोच–पैसा वाढतोय, पण सुविधा त्याच वेगाने का वाढत नाहीत?

पुणे महानगरपालिकेचे उदाहरण पुरेसे बोलके आहे. २०२५–२६ मध्ये १२ हजार ६०० कोटी रुपयांच्या महसुलाचे लक्ष्य असताना प्रत्यक्ष महसूल सुमारे ९ हजार २०० कोटी रुपये राहिला. बांधकाम परवानगी विभागाची वसुली २ हजार ८५३ कोटींच्या उद्दिष्टाच्या तुलनेत २ हजार ३४१ कोटी रुपये झाली. मालमत्ता करातून नियमित वसुलीही मागील वर्षाच्या तुलनेत कमी राहिली. याचा अर्थ महापालिका किंवा स्थानिक संस्था कामच करत नाहीत, असा सरसकट निष्कर्ष काढता येणार नाही. प्रश्न अधिक गंभीर आहे–निधी, महसूल, नियोजन, निविदा, कंत्राटदार, देखरेख आणि प्रत्यक्ष सेवा यांच्यातील साखळी कुठे कमकुवत होते? महालेखापरीक्षकांनीही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या संदर्भात अंतर्गत नियंत्रण, लेखे, उपयोगिता प्रमाणपत्रे आणि उत्तरदायित्वातील त्रुटींकडे लक्ष वेधले आहे. म्हणून आता केवळ ‘किती कोटी खर्च झाले?’ हा प्रश्न पुरेसा नाही. किती काम झाले, त्याचा दर्जा काय, कामाची किंमत किती, वेळ किती लागला आणि निकृष्ट कामासाठी जबाबदार कोण? या प्रश्नांची उत्तरे सार्वजनिक झाली पाहिजेत. लोकशाहीची खरी परीक्षा निवडणुकीच्या दिवशी होत नाही; ती नागरिक रोज रस्त्यावरून जाताना, नळ उघडताना, कचरा बाहेर ठेवताना आणि पावसात घराबाहेर पडताना होते. विकासाचा खरा मापदंड अर्थसंकल्पातील शून्यांची संख्या नाही. नागरिकाच्या रस्त्यावरचा खड्डा भरला का, नळाला वेळेवर पाणी आले का, कचरा उचलला का आणि पावसात शहर बुडाले नाही का, हा आहे. म्हणूनच महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांसमोर आजचा खरा प्रश्न निधीचा नसून निधीच्या परिणामाचा आहे. पैसा किती आला याचा हिशेब सरकार देते; ण त्या पैशातून नागरिकाला काय मिळाले, याचा हिशेब कोण देणार? आता स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभार केवळ कागदावरील खर्चातून नव्हे, तर नागरिकांच्या जीवनात झालेल्या प्रत्यक्ष बदलातून मोजण्याची वेळ आली आहे.

## सहा वर्षांपासून फरार असलेला आरोपी अखेर शिवाजीनगर पोलिसांच्या जाळ्यात



**बीड । प्रतिनिधी**

**गेल्या सुमारे सहा वर्षांपासून पोलिसांना चकवा देणाऱ्या आणि शस्त्र कायदा (आर्म्स क्ट) प्रकरणातील फरार आरोपीला जेरबंद करण्यात शिवाजीनगर पोलिसांना मोठे यश आले आहे. कुंदनसिंग जागुसिंग जुन्नी (रा. महासांगवी रोड, पाटोदा, ता. पाटोदा, जि. बीड) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.**

शिवाजीनगर पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्हा रजिस्टर क्रमांक २८९/२०२० मधील कलम ३/२५ भारतीय हत्यार कायद्यांतर्गत हा आरोपी गुन्हा दाखल झाल्यापासून फरार होता. तो पोलिसांना सातत्याने गुंगारा देत होता. त्याचा शोध घेण्यासाठी शिवाजीनगर पोलिसांचे पथक सातत्याने मागावर होते. दरम्यान, गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी सापळा रचून आरोपी कुंदनसिंग जुन्नी याला शिताफीने ताब्यात घेतले व अटक केली. ही धडक कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक श्री. समीर शेख तसेच पोलीस उपअधीक्षक श्री. नवले यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. कारवाईत शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शीतलकुमार बल्लाळ, पोलीस उपनिरीक्षक माधव काटकर, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक संतोष राऊत, पोलीस हवालदार रवींद्र आघाव आणि पोलीस हवालदार शिवदास घोलप यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

## कांताबाई बांगर यांची भाजप महिला विकास आघाडीच्या पाटोदा तालुकाध्यक्षपदी निवड



**पाटोदा । प्रतिनिधी**

**भायाळा गावच्या उपसरपंच श्रीमती कांताबाई तात्यासाहेब बांगर यांची भारतीय जनता पार्टीच्या महिला विकास आघाडीच्या पाटोदा तालुकाध्यक्षपदी नुकतीच नियुक्ती करण्यात आली आहे.**

भाजपचे बीड जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांच्या हस्ते कांताबाई बांगर यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी त्यांचा सत्कार करून पुढील सामाजिक व संघटनात्मक कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. भारतीय जनता पार्टीच्या ‘राष्ट्र प्रथम, नंतर पक्ष, शेवटी स्वतः’ या विचारसरणीनुसार पक्षाची ध्येयधोरणे आणि संघटनात्मक विचार तळागाळातील महिलांपर्यंत पोहोचविण्यासाठी कांताबाई बांगर यांची निवड करण्यात आली आहे. पाटोदा तालुक्यात महिलांचे संघटन अधिक मजबूत करणे, महिलांच्या विविध समस्या जाणून घेऊन त्या सोडविण्यासाठी प्रयत्न करणे आणि पक्षाची संघटनात्मक ताकद वाढविणे, यासाठी त्या कार्यरत राहणार आहेत. कांताबाई बांगर यांच्या निवडीबद्दल भाजपच्या ज्येष्ठ नेत्या पंकजाताई मुंडे, खासदार डॉ. प्रीतमताई मुंडे यांच्यासह पक्षातील वरिष्ठ पदाधिकारी, स्थानिक कार्यकर्ते आणि नागरिकांनी त्यांचे अभिनंदन केले. तसेच त्यांच्या पुढील सामाजिक व राजकीय वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तालुक्यात महिलांचे संघटन अधिक सक्षम करण्यासोबतच महिलांच्या विविध समस्या सोडविण्यासाठी आपण कटिबद्ध राहू, असा विश्वास कांताबाई बांगर यांनी यावेळी व्यक्त केला. :

## दारूचे सेवन शरीरावर, मनावर आणि कुटुंबावर होणारे परिणाम- डॉ.टेकाळे

**बीड । प्रतिनिधी**

**दारू घेतल्याशिवाय आराम वाटत नाही का? तणाव किंवा चिंता कमी करण्यासाठी दारूचा वापर करता का? दारूचे प्रमाण हळूहळू वाढत आहे का? दारू कमी करण्याचा प्रयत्न करूनही पुन्हा सेवन होते का? दारूचे सेवन सुरुवातीला केवळ एक सवय वाटू शकते. मात्र वारंवार सेवन केल्याने शरीर आणि मनावर त्याचा परिणाम होऊ शकतो आणि काही लोकांमध्ये दारूची सवय नियंत्रणाबाहेर जाऊ शकते.**



दारूची सवय वाढण्यामागची काही कारणे. मित्रांचा किंवा सामाजिक वातावरणाचा प्रभाव तणाव आणि मानसिक दबाव दुःख किंवा चिंता विसरण्यासाठी दारूचा वापर रिकामा वेळ आणि चुकीच्या सवयी नियमितपणे दारू घेण्याची सवय दारू घेतल्याने तात्पुरते आराम मिळतो असा समज दारूच्या अतिसेवनाचे शरीरावर परिणाम यकृताच्या आरोग्यावर परिणाम होऊ शकतो रक्तदाब आणि हृदयाच्या आरोग्यावर परिणाम होऊ शकतो. झोपेची गुणवत्ता बिघडू शकते पचनाशी संबंधित समस्या होऊ शकतात स्मरणशक्ती आणि एकाग्रतेवर परिणाम होऊ शकतो अपघात आणि दुखापतीचा धोका वाढू शकतो.दारूचा परिणाम फक्त शरीरावरच होत नाही कुटुंबातील नात्यांवर ताण येऊ शकतो. अनावश्यक आर्थिक खर्च वाढू शकतो. मानसिक तणाव आणि चिडचिड वाढू शकते. कुटुंबीयांच्या जीवनावरही त्याचा परिणाम होऊ शकतो. दारू कमी करण्यासाठी चांगल्या सवयी दारू घेण्याची इच्छा कधी आणि का होते हे ओळखा. दारूची आठवण करून देणारे प्रसंग आणि वातावरण शक्यतो टाळा. रिकामा वेळ व्यायाम, चालणे किंवा आवडीच्या कामात घालवा. कुटुंबातील विश्वासू व्यक्तीशी मोकळेपणाने बोला. तणावासाठी दारूऐवजी योग, ध्यान किंवा इतर आरोग्यदायी पर्याय निवडा. गरज वाटल्यास डॉक्टर किंवा व्यसनमुक्ती तज्ज्ञांची मदत घ्या.दारू कमी करायची किंवा सोडायची इच्छा असल्यास एकट्याने संघर्ष करण्यापेक्षा विश्वासू व्यक्ती आणि योग्य तज्ज्ञांची साथ घ्या. आजचा संदेश‘‘दारूपासून दूर राहणे म्हणजे फक्त एक सवय सोडणे नाही; ते स्वतःच्या आरोग्यासाठी, कुटुंबासाठी आणि भविष्यासाठी घेतलेला चांगला निर्णय आहे.‘‘ असे मत डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे एम.बी.बी.एस., एम.डी.मानसोपचार तज्ञ (गोल्ड मॅडॅलिस्ट)न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट यांनी व्यक्त केले. डॉ.जगदीश टेकाळे महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात साई(गावते कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड,डॉक्टर लाईन,बस स्टॅण्डच्या पाठीमागे येथे उपलब्ध असतात.

## ब्रह्मगावच्या शृंगेरी देवी मंदिरात चोरट्यांचा डल्ला; दागिन्यांसह दानपेटी फोडून ६४ हजारांचा ऐवज लंपास

**आष्टी । प्रतिनिधी**

**आष्टी तालुक्यातील ब्रह्मगाव येथील प्रसिद्ध शृंगेरी देवी मंदिरात अज्ञात चोरट्यांनी मध्यरात्री डल्ला मारून देवीचे दागिने, मूर्ती तसेच दानपेटीतील रोकड असा मुद्देमाल लंपास केला. या चोरीत सुमारे ६४ हजार रुपयांचा ऐवज चोरीस गेल्याचे समोर आले असून, दानपेटीतील रोख रक्कम स्वतंत्र आहे. मंदिरात वारंवार चोरीच्या घटना घडत असल्याने भाविकांमध्ये चिंता व्यक्त होत असून, या प्रकरणाचा छडा लावण्याचे आव्हान आष्टी पोलिसांसमोर उभे राहिले आहे.**

मिळालेल्या माहितीनुसार, ब्रह्मगाव येथील शृंगेरी देवी मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष विजय मारुती हराळ (वय ५२) यांनी आष्टी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. मंदिराच्या देखभालीसह सुरक्षेसाठी बाळू निकाळजे यांची नेमणूक करण्यात आली आहे. शनिवारी दि. ३ ऑक्टोबर रोजी रात्री ११ ते १२ वाजण्याच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी मंदिराच्या चॅनेल गेटचे कुलूप तोडून आत प्रवेश केल्याचे फिर्यादीत नमूद आहे. रविवारी दि. ४ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ वाजता मंदिराचे पुजारी कल्याण निंबाळकर यांना मंदिराच्या गेटचे कुलूप तुटलेल्या अवस्थेत आढळून आले. त्यांनी तत्काळ मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष विजय हराळ यांना दूरध्वनीवरून माहिती दिली. त्यानंतर हराळ यांनी सरपंच रोहिदास पवार यांच्यासह मंदिरात पाहणी केली असता चोरीचा प्रकार उघडकीस आला. चोरट्यांनी मंदिरातून १५ हजार रुपये किमतीचे १२ बॅटेक्स अलंकार, ४ हजार रुपयांचे दोन बॅटेक्स टोप, ४० हजार रुपये किमतीचा चांदीचा गणपती, ३ हजार रुपयांच्या दोन पितळी मूर्ती तसेच २ हजार रुपयांच्या बॅटेक्सच्या दोन नथी, असा एकूण ६४ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केला. याशिवाय चोरट्यांनी मंदिरातील दानपेटीचे कडी–कोयंडा व कुलूप तोडून त्यातील रोकडही चोरून नेली. दानपेटीत नेमकी किती रक्कम होती, याचा अद्याप निश्चित अंदाज आलेला नाही. दरम्यान, मंदिर परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या फुटेजमध्ये रात्रीच्या वेळी संशयित हालचाली अथवा संशयित व्यक्तींचे फुटेज आढळल्याची चर्चा असून, पोलिसांकडून या फुटेजची तपासणी केली जात असल्याचे समजते. त्यामुळे चोरट्यांच्या हालचाली, मंदिरात प्रवेश करण्याची पद्धत आणि चोरीनंतर त्यांनी घेतलेला मार्ग याबाबत तपासाला दिशा मिळण्याची शक्यता आहे. शृंगेरी देवी मंदिरात यापूर्वीही चोरीच्या घटना घडल्याची चर्चा असल्याने, मंदिराच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. धार्मिक स्थळी वारंवार चोरी होत असल्याने भाविकांमध्ये नाराजी असून, मंदिर परिसरात प्रभावी सुरक्षा व्यवस्था, सीसीटीव्ही यंत्रणा आणि रात्रीची निगराणी अधिक मजबूत करण्याची गरज व्यक्त केली जात आहे. या प्रकरणी विजय हराळ यांच्या फिर्यादीवरून आष्टी पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार विकास जाधव करीत आहेत. चोरीचा छडा लावून चोरट्यांना तातडीने जेरबंद करण्याचे आव्हान पोलिसांसमोर आहे.

## पान १ वरून...

### दुष्काळग्रस्त महाराष्ट्रासाठी केंद्राची

पिण्याच्या पाण्याची तसेच चाऱ्याची समस्या गंभीर होण्याची शक्यता आहे. राज्यातील सुमारे ३२ जिल्ह्यांमध्ये दुष्काळाची तीव्रता जाणवत असून, मोठ्या प्रमाणावर तालुके दुष्काळाने प्रभावित झाले आहेत, अशी माहिती फडणवीस यांनी शाह यांना दिली. राज्याची परिस्थिती प्रत्यक्ष पाहण्यासाठी केंद्राचे पथक तातडीने महाराष्ट्रात पाठवावे, अशी विनंतीही त्यांनी केली. केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांच्याशीही यापूर्वी चर्चा झाली असल्याचे फडणवीस यांनी सांगितले. त्यानुसार केंद्र सरकारचे पथक ८ ते ११ ऑक्टोबरदरम्यान महाराष्ट्रातील विविध दुष्काळग्रस्त भागांची प्रत्यक्ष पाहणी करणार आहे. पथकाकडून पिकांचे नुकसान, पाणीटंचाई आणि दुष्काळाची एकूण परिस्थिती यांचा आढावा घेतला जाणार असून त्यानंतर केंद्राला अहवाल सादर केला जाणार आहे. या अहवालासोबत महाराष्ट्र सरकारने केंद्राकडे पाठविलेल्या प्रस्तावाचा विचार करून एनडीआरएफच्या माध्यमातून मदतीबाबत निर्णय घेतला जाणार आहे. त्यामुळे केंद्राच्या पथकाचा दौरा आणि त्यानंतरचा अहवाल महाराष्ट्राच्या दुष्काळी मदतीच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरणार आहे.

-----------

### एमपीएससी आंदोलन हायजॅक; ते

सर्वोच्च न्यायालय आणि राष्ट्रपती यांचा सहभाग असतो, हे सरकारने विद्यार्थ्यांना समजावून सांगितले होते. आम्ही त्यांना सांगितले की, अध्यक्षांना पदावरून दूर करण्याचा अधिकार केवळ राष्ट्रपतींकडे आहे आणि तोही सर्वोच्च न्यायालयाने चौकशी करून आपले निष्कर्ष राष्ट्रपतींकडे सादर केल्यानंतरच वापरला जाऊ शकतो. तरीही, सरकारने न्यायालयीन चौकशी करण्यास सहमती दर्शवली. चौकशीत गैरवर्तन आढळल्यास कलम ३१७ अन्वये अध्यक्षांना पदावरून दूर करण्याची शिफारस करण्यासही सरकार तयार असल्याचे फडणवीस यांनी सांगितले. त्यांच्या म्हणण्यानुसार, सरकारने एमपीएससीच्या कामकाजात अधिक पारदर्शकता आणण्याच्या मागण्या मान्य केल्या आहेत आणि विद्यार्थी, प्राध्यापक व एमपीएससीचे माजी परीक्षार्थी यांच्याशी चर्चा करून सुधारणांची शिफारस करण्यासाठी एक समिती स्थापन केली आहे. यापूर्वीच्या परीक्षांच्या बाबतीत प्रश्नपत्रिका फुटल्याचा कोणताही पुरावा समोर आलेला नसतानाही त्या परीक्षांची चौकशी करण्यास परवानगी देण्यात आली होती. जर असा अडथळा निर्माण करणे सुरूच राहिले, तर मला असे वाटते की, विद्यार्थ्यांच्या हिताऐवजी राजकीय हितसंबंध जपले जात आहेत. हे आंदोलन पूर्णपणे राजकीय झाले आहे, असे फडणवीस म्हणाले. राजकीय घटक विद्यार्थ्यांच्या मुद्द्याचा वापर करून स्वतःचे हित साधण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप फडणवीस यांनी केला.

-----------

### राजधानी दिल्लीत बुधवारीही

विरोधकांनी निवडणूक आयोगाविरोधात आंदोलन तीव्र केले आहे. आयोगाने मात्र राजकीय पक्षांच्या भेटीसाठी पूर्वनिश्चित प्रक्रिया असल्याचे स्पष्ट केले आहे. राहुल गांधी यांच्याप्रमाणेच काँग्रेस नेत्या प्रियांका गांधी वाड्रा यांनीही पोलिसांच्या कारवाईचा विरोध केला. त्या रस्त्यावरच ठिय्या देऊन बसल्या. पोलिसांनी आपल्याशी गैरवर्तन केल्याचा आणि जमिनीवर पाडल्याचा आरोप त्यांनी केला. महिला पोलिसांनी आपल्याला अनेक ठिकाणी ओरखडे काढल्याचा दावाही प्रियांका गांधी यांनी केला. दरम्यान, पोलिसांनी प्रियांका गांधी यांच्यासह आंदोलन करणाऱ्या इतर महिला नेत्यांनाही तेथून हटवले. जंतरमंतरकडे जाणाऱ्या मार्गावर पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. विरोधी खासदारांच्या बस काही अंतरावरच रोखण्यात आल्या. त्यानंतर अनेक खासदार बसमधून खाली उतरून रस्त्यावर आंदोलन करू लागले. दरम्यान, आरजेडीचे खासदार मनोज कुमार झा यांनी पोलिसांच्या कारवाईवर तीव्र आक्षेप घेतला. आंदोलनादरम्यान पोलिसांनी लाठीचार्ज केल्याचा आरोप त्यांनी केला. या कारवाईसाठी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना जबाबदार धरत त्यांनी संताप व्यक्त केला. विरोधी खासदारांना ताब्यात घेण्याची ही कारवाई सलग दुसऱ्या दिवशी झाली आहे. मंगळवारीही राहुल गांधी, प्रियांका गांधी यांच्यासह विरोधी खासदारांनी निवडणूक आयोगाच्या कार्यालयाकडे जाण्याचा प्रयत्न केला होता. त्यावेळी त्यांना रोखण्यात आल्यानंतर त्यांनी आकाशवाणी भवनाजवळ दीर्घकाळ ठिय्या आंदोलन केले होते. बुधवारच्या आंदोलनामुळे राजधानी दिल्लीतील राजकीय वातावरण पुन्हा तापले असून, निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवरून विरोधक आणि केंद्र सरकार यांच्यातील संघर्ष आणखी तीव्र झाल्याचे चित्र आहे.

-----------

### विद्यार्थ्यांना आंदोलन

घेतल्या जातील त्या निष्पक्ष आणि पारदर्शक असतील व त्यात कोणतेही गैरप्रकार होणार नाहीत. विद्यार्थ्यांचा विश्वास पुन्हा संपादन करण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले जावेत, असेही यावेळी त्यांनी सांगितले. पुढे उच्च न्यायालयाने असेही स्पष्ट केले की, भरती प्रक्रिया पार पडेल आणि ती सुव्यवस्थित असेल, याची सुनिश्चिती करण्याची जबाबदारी राज्यावर आहे. विद्यार्थ्यांना काही तक्रार असल्यास आंदोलन करण्याचा अधिकार आहे, असेही खंडपीठाने नमूद केले. जर विद्यार्थी आंदोलित असतील, तर काही गोष्टींचा विचार करणे आवश्यक आहे. परीक्षा योग्य पद्धतीने होत नसल्याचे त्यांना आढळल्यास, त्याबाबत योग्य ती कारवाई केली पाहिजे. जर त्यांना संधी मिळत नसेल आणि काहीतरी गडबड किंवा गैरप्रकार झाल्याचा त्यांना संशय असेल, तर त्यांना आंदोलन करण्याचा अधिकार आहे; कारण त्यांनी अभ्यासासाठी आपला खूप वेळ दिलेला असतो, असेही न्यायाधीशांनी नमूद केले. आंदोलकांविरुद्ध पोलिसांनी संयम बाळगला आणि त्यांच्यावर कोणताही गुन्हा दाखल केला नाही, अशी माहिती खंडपीठाला देण्यात आली. मुख्य न्यायमूर्तींनी या कृतीचे कौतुक केले. ते विद्यार्थी आहेत, समाजकंटक नाहीत, असेही न्यायालयाने यावेळी स्पष्ट केले. तथापि, आता उच्च न्यायालयाने या प्रकरणाची दखल घेतली असल्याने, विद्यार्थ्यांनी आंदोलन थांबवून पुन्हा अभ्यासाला लागावे, असे आवाहनही केले. न्यायालयाकडे हे प्रकरण प्रलंबित नाही आणि विश्वास पुन्हा निर्माण केला गेला पाहिजे. त्यांच्या तक्रारींचे निवारण झाले पाहिजे. परीक्षा मुक्त आणि निष्पक्ष वातावरणात पार पडल्या पाहिजेत. राज्य सरकार यावर काय पावले उचलत आहे, हे मी पाहीन. त्यांनी न्यायालयावर विश्वास ठेवला पाहिजे. बहुतेक विद्यार्थ्यांना अभ्यासात खरोखर रस असतो; ते अशा गोष्टींसाठी (निदर्शनांसाठी) येत नाहीत. मी सर्व विद्यार्थ्यांना विनंती करेन की त्यांनी आपल्या विभागाकडे (फॅकल्टीकडे) परत जावे. तुम्हाला शिक्षणासाठी पुण्यात पाठवणाऱ्या तुमच्या पालकांची दयनीय अवस्था पहा. ही मुले निष्पाप आहेत, पण आता ती रस्त्यावर आली आहेत. त्यांचे करिअर खराब होईल, असेही न्यायाधीशांनी सांगितले. न्यायाधीशांनी आंदोलकांना अशी ताकिदही दिली की, शांतताप्रिय शहर आणि नागरिकांना कोणताही त्रास होणार नाही, याची काळजी घ्यावी. न्यायालयाने राज्य सरकारला ३ आठवड्यांच्या आत अहवाल सादर करण्याचे आदेश दिले. या प्रकरणाची पुढील सुनावणी २५ नोव्हेंबर रोजी होणार आहे.

---------

### पोलिसांनी परवानगी नाकारली; मात्र

आली आहे. सौरव दास यांनी संसद मार्ग पोलीस ठाण्यात पत्र देऊन आंदोलनाची माहिती पोलिसांना कळवली. ‘नंतर आम्ही कळवलेच नव्हते, असा वाद नको,’ या भूमिकेतून पोलिसांना अधिकृत माहिती देण्यात आल्याचे दास यांनी स्पष्ट केले. आंदोलनादरम्यान सीजेपीकडून दिल्ली पोलिसांना पूर्ण सहकार्य केले जाईल, असेही त्यांनी सांगितले. त्याचवेळी पोलिसांनीही आंदोलनकर्त्यांना सहकार्य करावे, अशी अपेक्षा व्यक्त करत त्यांनी पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. ‘जंतर मंतर हे आंदोलनासाठी निश्चित केलेले आणि ऐतिहासिक ठिकाण आहे. येथे शांततापूर्ण आंदोलने होतात. त्यामुळे आंदोलनाची परवानगी देण्यापेक्षा पोलिसांनी आंदोलकांच्या सुरक्षेची काळजी घ्यावी, कायदा–सुव्यवस्था राखावी आणि वाहतूक नियंत्रणाची जबाबदारी पार पाडावी,’ असे दास यांनी म्हटले. १० ऑक्टोबरच्या आंदोलनाची घोषणा २ ऑक्टोबर रोजी मुंबईतील शिवाजी पार्क येथे झालेल्या पक्षाच्या आंदोलनादरम्यान अभिजीत दीपके यांनी केली होती. ज्ञानेश कुमार यांनी पदाचा राजीनामा दिला नाही, तर सीजेपी दिल्लीतील जंतर मंतरवर आंदोलन करेल, अशी भूमिका त्यावेळी स्पष्ट करण्यात आली होती. सीजेपीने एआयआर प्रक्रियेत कथित घोटाळा झाल्याचा आरोप करत मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी लावून धरली आहे. या मागणीसाठी आता दिल्लीतील आंदोलनावरून सीजेपी आणि दिल्ली पोलीस आमनेसामने आले आहेत.

-----------

### लोकप्रतिनिधी बांधावरून

मुंडे, आमदार संदीप क्षीरसागर, आमदार विजयसिंह पंडित, आमदार नमिता मुंदडा आणि आमदार प्रकाश सोळंके हे प्रमुख नेते अजूनही शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचलेले नाहीत. शेतात पिकांचे झालेले नुकसान, पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष आणि जनावरांच्या छावण्यांची गरज यावर प्रशासनाकडे पाठपुरावा करण्याऐवजी नेतेमंडळी शांत असल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.निवडणुका आल्या की नेते गल्लीबोळात हात जोडून फिरतात, मात्र दुष्काळाने कंबरडे मोडले असताना एकाही नेत्याला आमची आठवण नाही, अशा संतप्त प्रतिक्रिया शेतकरी वर्ग देत आहे. प्रशासकीय पातळीवर पंचनामे आणि मदतीची घोषणा कागदावरच अडकलेली असताना लोकप्रतिनिधींच्या या उदासीनतेमुळे बीडच्या बळीराजाची अवस्था 'आभाळच फाटलंय, तर ठिगळ कुठे लावायचं?' अशी झाली आहे. लोकप्रतिनिधींनी तात्काळ राजकारण बाजूला ठेवून बांधावर उतरावे आणि शासनाकडून ठोस मदत मिळवून द्यावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे. बीडच्याच परंतु जालन्याच्या पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी जालना जिल्हा सोबतच बीड जिल्ह्यातील अनेक परिसरात जाऊन थेट शेतातून शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून घेतल्या आता त्या बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री हव्या होत्या असा देखील सूर उमटत आहे मात्र त्या बीड जिल्ह्याच्या असल्याने त्यांना जिल्ह्यातील जनता शेतकरी यांच्या विषयी काहीतरी जिव्हाळा असावा म्हणून त्या थेट बांधावर गेले मात्र बीड जिल्ह्यातील ज्या सुजान मतदारांनी आपला प्रतिनिधी म्हणून निवडून दिले ते खासदार आणि जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधी हे मात्र अद्याप शेतकऱ्याच्या बांधावर दिसून आले नाहीत विशेष सध्या फार मोठ्या निवडणुका नाहीत अन्यथा नेत्यांची शेतकऱ्यांच्या दारात गर्दी दिसली असती परंतु आता शेतकरी अडचणीत असताना लोकप्रतिनिधींनी हस्तेवायिकपणे जाऊन चौकशी करणे गरजेचे आहे शेवटी आभाळच फाटलं ठिगळ लावणार कुठे अशी अवस्था बळीराजाची झालेली दिसत आहे.

--------------

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
गुरुवार दि.०८ ऑक्टोबर २०२६





## महाराष्ट्रातील शिवाचार्यांची बैठक

बीड । प्रतिनिधी

आज बुधवार दि ७ ऑक्टोबर २०२६ रोजी अखिल भारतीय वीरशैव शिवाचार्य संस्थेचे उपाध्यक्ष - श्री ष ब्र डॉ १०८ श्रीकंठ शिवाचार्य महाराज नागानसुर सोलापुर यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्रातील शिवाचार्यांची बैठक संपन्न करण्यात आली. या बैठकीत वीरशैव लिंगायत शिवाचार्य महासभा महाराष्ट्र या संस्थेच्या राज्य अध्यक्षपदी श्री ष ब्र १०८ तपोरत्न नंदिकेश्वर शिवाचार्य महाराज सोनपेठकर यांची एकमताने निवड करण्यात आली तसेच कार्याध्यक्ष शिवाचार्य रत्न श्री ष ब्र १०८ डॉ शंभुलिंग शिवाचार्य महाराज उदगीरकर तर उपाध्यक्ष: श्री ष ब्र १०८ गुरुपादेश्वर शिवाचार्य महाराज गिरगावकर व सचिव श्री ष ब्र १०८ डॉ. विरुपाक्ष शिवाचार्य महाराज मुखेडकर व तसेच कोषाध्यक्ष श्री ष ब्र १०८ महादेव शिवाचार्य वाईकर महाराज आणि प्रवक्ते म्हणून श्री ष ब्र १०८ अमृतेश्वर शिवाचार्य महाराज जिंतूरकर व तसेच श्री ष ब्र १०८ दिगंबर शिवाचार्य महाराज वसमतकर या सर्व महाराष्ट्रातील शिवाचार्य महाराजांच्या वीरशैव लिंगायत शिवाचार्य महासभा महाराष्ट्र यांच्या नियुक्त्या श्री क्षेत्र मन्मथ स्वामी देवस्थान कपिलधार मांजरसुंबा येथे करून नूतन कार्यकारणी स्थापन करण्यात आली.

## हिंगोलीतील फटाका दुर्घटना अत्यंत दुर्दैवी -पालकमंत्री नरहरी झिरवाळ

हिंगोली । प्रतिनिधी

हिंगोली शहरातील मारवाडी गल्ली परिसरात फटाक्यांच्या साठवणुकीच्या ठिकाणी लागलेली आग अत्यंत दुर्दैवी व गंभीर आहे. या दुर्घटनेत प्राथमिक माहितीनुसार दोन नागरिकांचा मृत्यू झाला असून अनेक नागरिक जखमी झाले आहेत. जखमींना तातडीने आवश्यक ते सर्वोत्तम उपचार मिळावेत, अशा सूचना प्रशासनाला देण्यात आल्या आहेत, अशी माहिती अन्न व औषध प्रशासन मंत्री तथा हिंगोली जिल्ह्याचे पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांनी दिली.

या दुर्घटनेतील मृतांच्या कुटुंबीयांप्रती पालकमंत्री झिरवाळ यांनी मनःपूर्वक संवेदना व्यक्त केली.

नियमांनुसार फटाक्यांची साठवणूक, आवश्यक परवानग्या आणि सुरक्षेच्या नियमांचे पालन आदी बाबींची सखोल चौकशी करण्याचे निर्देश हिंगोली जिल्हाधिकारी यांना पालकमंत्री झिरवाळ यांनी दिले आहेत. चौकशीत नियमांचे उल्लंघन किंवा निष्काळजीपणा आढळल्यास संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, असे निर्देशही पालकमंत्री झिरवाळ यांनी दिले आहेत.

तसेच जिल्ह्यातील सर्व फटाका विक्री व साठवणूक केंद्रांची तातडीने तपासणी करावी. या ठिकाणी सुरक्षाविषयक उपाययोजनांची काटेकोर अंमलबजावणी होत असल्याची खात्री करावी, अशा सूचनाही पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांनी प्रशासनाला दिल्या आहेत.

# आष्टी तालुक्यात ९,४६३ शेतकऱ्यांच्या खात्यावर कर्जमाफीची रक्कम जमा

### केवायसीअभावी ३,७८ शेतकरी अद्याप लाभापासून वंचित; केवायसी पूर्ण करण्याचे सहाय्यक निबंधक पूजा सांगळे यांचे आवाहन

आष्टी । प्रतिनिधी

राज्य शासनाने नुकतीच जाहीर केलेल्या कर्जमाफी योजनेचा आष्टी तालुक्यातील शेतकऱ्यांना लाभ मिळण्यास सुरुवात झाली आहे. तालुक्यातील एकूण १२ हजार ६४१ शेतकरी कर्जमाफीसाठी पात्र ठरले असून, त्यापैकी ९ हजार ४६३ शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर कर्जमाफीची रक्कम वर्ग करण्यात आली आहे. मात्र, अद्याप ३ हजार १७८ शेतकऱ्यांनी केवायसी प्रक्रिया पूर्ण केलेली नसल्याने हे शेतकरी कर्जमाफीच्या लाभापासून वंचित राहिले आहेत.



आष्टी येथील सहाय्यक निबंधक कार्यालयात कर्जमाफी योजनेबाबत माहिती देताना सहाय्यक निबंधक पूजा सांगळे यांनी सांगितले की, राज्य शासनाने शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी कर्जमाफी योजना लागू केली आहे. या योजनेअंतर्गत आष्टी तालुक्यातील पात्र शेतकऱ्यांची प्रक्रिया करण्यात आली आहे. त्यापैकी मोठ्या संख्येने शेतकऱ्यांच्या खात्यावर कर्जमाफीची रक्कम जमा झाली आहे.

मात्र, काही शेतकऱ्यांची केवायसी प्रक्रिया अद्याप पूर्ण झालेली नसल्यामुळे त्यांच्या कर्जमाफीची रक्कम वर्ग होऊ शकलेली नाही.

#### ९,४६३ शेतकऱ्यांना मिळाला लाभ

आष्टी तालुक्यात कर्जमाफीसाठी पात्र ठरलेल्या १२ हजार ६४१ शेतकऱ्यांपैकी ९ हजार ४६३ शेतकऱ्यांच्या खात्यावर रक्कम जमा झाली आहे. त्यामुळे पात्र शेतकऱ्यांपैकी मोठ्या संख्येने शेतकऱ्यांना शासनाच्या कर्जमाफीचा प्रत्यक्ष लाभ मिळाला आहे. उर्वरित शेतकऱ्यांनीही आवश्यक प्रक्रिया पूर्ण केल्यास त्यांना योजनेचा लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

#### केवायसी पूर्ण करण्याचे आवाहन

कर्जमाफीच्या यादीत नाव असूनही केवायसी पूर्ण न झाल्याने लाभ मिळालेला नसलेल्या शेतकऱ्यांनी संबंधित बँक अथवा आवश्यक ठिकाणी संपर्क साधून आपली केवायसी तातडीने पूर्ण करून घ्यावी, असे आवाहन सहाय्यक निबंधक पूजा सांगळे यांनी केले आहे. शेतकऱ्यांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता शासनाच्या अधिकृत प्रक्रियेनुसार आवश्यक कागदपत्रे व केवायसीची प्रक्रिया पूर्ण करावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.कर्जमाफीची रक्कम खात्यावर जमा झाल्याने हजारो शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असून, आता केवायसी प्रलंबित असलेल्या ३ हजार १७८ शेतकऱ्यांनीही प्रक्रिया पूर्ण करून योजनेचा लाभ घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

तालुक्यातील ३ हजार १७८ शेतकरी या कारणामुळे लाभापासून अद्याप दूर आहेत. त्यामुळे संबंधित शेतकऱ्यांनी विलंब न करता आपली केवायसी प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन पूजा सांगळे यांनी केले आहे.

## अंमळनेर येथे रेणुकामाता नवरात्रोत्सवानिमित्त दि.११ ते १९ ऑक्टोबर दरम्यान महिला अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्याचे आयोजन

पिंपळवंडी । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील अंमळनेर येथे भवानीनगर रेणुका माता मंदिरामध्ये नवरात्र महोत्सवानिमित्त ह.भ.प. गुरुवर्य महंत श्री १००८ स्वामी महादेवानंद भारती महाराज श्री क्षेत्र अश्वत्थलिंग संस्थान यांच्या मार्गदर्शनाखाली रविवार दि.११ ते सोमवार दि.१९/१०/२०२६ या कालावधीत फिरता महिला अखंड हरिनाम सप्ताह (वर्ष ४ थे) आयोजित केला असून यादरम्यान विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन केले असून महिला किर्तनकार व संत महंतांच्या उपस्थितीत हा सप्ताह सोहळा भक्तीमय वातावरणात संपन्न होणार आहे.या सप्ताह सोहळ्यामध्ये कल्याण स्वामी वारकरी शिक्षण संस्था चकलांबा मधील १०१ मुली गायनाचार्य, मृदंगाचार्य,हार्मोनियम वादक, टाळकरी व हरिपाठ किर्तनकार व प्रवचनकार ९ दिवस महिला व मुलींच्या नियोजनात कार्यक्रम पार पडणार आहे.या कार्यक्रमाचा पंचक्रोशीतील भाविक-भक्तांनी मोठ्या संख्येने येऊन लाभ घ्यावा असे आवाहन समस्त गावकरी अंमळनेर,मिसाळवाडी, डागाचीवाडी,दौलतवाडी व पंचक्रोशी यांच्या वतीने करण्यात आले आहे.सप्ताह दरम्यान दररोज पहाटे ४ ते ६ काकडा भजन,६ ते ८ स्वामी समर्थ सेवा मंडळ दुर्गा सप्तशती पाठ,८ ते १० नाष्टा,१० ते १२ गाथा भजन,दुपारी १२ ते २ भोजन,२ ते ४ स्वामी समर्थ सेवा मंडळ दुर्गा सप्तसती हवनयुक्त पाठ,४ ते ५ प्रवचन,५ ते ६ हरिपाठ,सायंकाळी ७ ते ९ हरिकिर्तन,९ ते १० भोजन,१० ते १२ आराधी गाणी,१२ ते ४ हरी जागर असे कार्यक्रम होतील. सप्ताहातील प्रवचन व किर्तन सेवा दि.११/१०/२०२६ रविवार रोजी ह.भ.प.मीनाताई मडके,दि.१२ सोमवार ह.भ.प.संगीताताई सोळसकर व ह.भ.प.ज्ञानेश्वरी ताई जगताप बोधेगाव,दि.१३ मंगळवार ह.भ.प.वैष्णवी ताई वडधने, ह.भ.प.यमुनाताई पवार,दि.१४ बुधवार ह.भ.प.उर्मिला ताई वनारसे अंमळनेर,ह.भ.प.साध्वी सुवर्णानंद पैठण,दि.१५ गुरुवार ह.भ.प.आशाताई भास्कर पोकळे अंमळनेर,ह.भ.प.शिवांजलीताई जरांगे महाकाळा,दि.१६ शुक्रवार ह.भ.प.जयश्रीताई झिंजुर्के,ह.भ.प. गीतांजलीताई झेंडे आळंदी देवाची, दि.१७ शनिवार ह.भ.प.भक्तीताई गायकवाड चकलांबा,ह.भ.प.आरतीताई शिंदे नाशिक,दि.१८ रविवार ह.भ.प. साक्षीताई राऊत चकलांबा,ह.भ.प. साक्षीताई मस्के तसेच सोमवार दि.१९/१०/२०२६ रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत साध्वी ह.भ.प.सोनाली ताई करपे कल्याण स्वामी संस्थांन चकलांबा यांचे अमृततुल्य काल्याचे किर्तन होणार व त्यानंतर महाप्रसाद महापंगतीने कार्यक्रम सोहळ्याची सांगता होईल.



### पान ६ वरुन...

#### बीड शहराच्या पाणीपुरवठ्यासाठी

थकबाकी असल्यामुळे हा अतिरिक्त वीज भार मंजूर करण्यात तांत्रिक अडचणी येत होत्या.

या गंभीर समस्येवर तोडगा काढण्यासाठी आ. संदीप क्षीरसागर यांनी वरिष्ठ पातळीवर सातत्याने बैठका घेऊन हा विषय लावून धरला. त्यांच्याच प्रयत्नांमुळे आणि मागणीनुसार, जुलै २०२६ मध्ये उपमुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली तसेच नगर विकास विभागाच्या मुख्य सचिवांसोबत विशेष बैठका पार पडल्या. या बैठकीत मदत व पुनर्वसन विभागाकडून विशेष बाब म्हणून निधी उपलब्ध करून देण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली. याचा आधार घेत तसेच दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी बीड नगरपरिषदेमार्फत थकीत वीज बील भरण्याच्या अधीन राहून व आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ मधील तरतुदीस अनुसरुन दोन्ही ठिकाणी अतिरिक्त विद्युत भार विशेष बाब म्हणून तातडीने मंजूर करण्याबाबत महाराष्ट्र राज्य विद्यूत वितरण कंपनीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांच्याकडे पत्रव्यवहार केला आहे. आ.संदीप क्षीरसागर यांनी वेळेवर दाखवलेली तत्परता आणि केलेल्या विशेष प्रयत्नांमुळे बीडकरांवरील पाण्याचे मोठे संकट टळण्यास मदत होणार असून, नागरिकांमधून या कामगिरीबद्दल समाधान व्यक्त केले जात आहे.

#### बीड पोलिसांनी तीन वर्षांत

अशा प्रकारे सन २०२४ ते सप्टेंबर २०२६ या कालावधीत एकूण २,२४० हरवलेले अथवा चोरीस गेलेले मोबाईल शोधून काढण्यात पोलिसांना मोठे यश आले आहे. सर्वप्रथम संबंधित मोबाईल क्रमांकाचे सिम कार्ड ब्लॉक करून नवीन डुप्लिकेट सिम कार्ड घ्यावे.पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवा: जवळच्या पोलीस ठाण्यात मोबाईल हरवल्याची/चोरीची तक्रार नोंदवून त्याची प्रत घ्यावी CEIR पोर्टलवर नोंदणी करा: https://www.ceir.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन Block Stolen/Lost Mobile हा पर्याय निवडावा.

१५ अंकी IMEI क्रमांक व आवश्यक माहिती भरावी.

आवश्यक कागदपत्रे अपलोड करा: पोलीस तक्रारीची प्रत, मोबाईल खरेदीचे बिल आणि शासकीय ओळखपत्र (प्रत्येकी ५०० घइ पेक्षा कमी).मोबाईलवर प्राप्त जढझ पडताळून अर्ज सबमिट करावा. त्यानंतर मिळालेल्या ठर्शीर्शिीं खऊ द्वारे अर्जाची स्थिती ट्रॅक करता येते. मोबाईल परत मिळाल्यावर: फोन परत मिळाल्यानंतर उएखठ पोर्टलवर णपलश्रेलज्ञ ऱ्रींपव चेलळश्रश या पर्यायाचा वापर करून मोबाईल अनब्लॉक करावा

नवीन अथवा सेकंड हँड मोबाईल खरेदी करताना मोबाईलवरून *०६ डायल करून त्याचा १५ अंकी खचएख क्रमांक तपासून घ्यावा. संशयास्पद, ब्लॅकलिस्टेड किंवा ड्युप्लिकेट खचएख असलेला मोबाईल खरेदी करू नये, असा सावधगिरीचा इशारा पोलिसांनी दिला आहे.

**पोलीस प्रशासनाचे आवाहन:**

मोबाईल चोरीला गेल्यास किंवा हरवल्यास न घाबरता तात्काळ स्थानिक पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवावी व उएखठ पोर्टलवर मोबाईल ब्लॉक करावा. या प्रक्रियेत काही अडचण आल्यास संबंधित पोलीस ठाण्यातील सायबर डेस्कशी संपर्क साधावा.

- बीड जिल्हा पोलीस दल

## पाटोदा तालुक्यात कोरड्या दुष्काळाची दाहकता: जनावरांच्या चाऱ्याचा भीषण प्रश्न, रोजगारासाठी गावच्या गावे ओस

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यात यंदा पावसाने पूर्णपणे तोंड फिरविल्याने दुष्काळाची भीषणता दिवसेंदिवस अधिकच गडद होत चालली आहे. पिण्याच्या पाण्याची भीषण टंचाई आणि पिकांच्या नासाडीसोबतच आता गोठ्यातील पशुधनाचा आणि मजुरांच्या रोजगाराचा प्रश्न अत्यंत गंभीर बनला आहे. शेतात चारा-पाणी उरले नसल्याने शेतकऱ्यांवर आपली जिवापाड जपलेली गुरेढोरे कवडीमोलाने विकण्याची हतबल वेळ आली आहे.

**दावणीला चारा नाही, पाण्याचा थेंब नाही**

तालुक्यातील अनेक विहिरी, बोअरवेल आणि स्थानिक तलाव ऑगस्ट-सप्टेंबर महिन्यातच कोरडे ठणठण पडले आहेत. उभी पिके करपून गेल्याने कडबा आणि हिरव्या चाऱ्याची टंचाई प्रचंड वाढली आहे. विकतचा चारा आणायचा तरी कुठून आणि त्यासाठी पैसे कुठून उभारायचे? या विवंचनेत शेतकरी सापडले आहेत. दुष्काळामुळे

### दावणीची गुरं विकण्याची वेळ; टँकरच्या पाण्यासाठी महिलांची पायपीट, मजुरांचे शहरांकडे स्थलांतर सुरू

बाजारात जनावरांचे भाव प्रचंड घसरले असून, नाईलाजाने शेतकऱ्यांना आपली दावणीची जनावरे व्यापाऱ्यांच्या हाती सोपावी लागत आहेत.

**रोजगारासाठी शहरांकडे कूच; गावे पडली ओस**

शेतातील कामे पूर्णपणे थांबल्यामुळे गावातील तरुण आणि मजूर वर्ग रोजगाराच्या शोधात पुणे, मुंबई, छत्रपती संभाजीनगर यांसारख्या शहरांकडे स्थलांतरित होत आहेत. कित्येक कुटुंबांनी घरांना कुलूप ठोकून वीटभट्ट्यांवर किंवा बांधकामांवर मजुरीसाठी वाट धरली आहे. त्यामुळे तालुक्यातील अनेक गावांमध्ये फक्त वृद्ध आणि लहान मुलेच मागे उरली असून, गल्लीबोळ ओस पडल्यासारखे दिसत आहेत.

**कळशीभर पाण्यासाठी मैलोन्मैल भटकंती**

अनेक गाव-वाड्यांमध्ये प्रशासकीय टँकर अद्याप नियमित सुरू न झाल्याने किंवा त्यांचे फेरे अपुरे पडत असल्याने महिलांना उन्हातानात मैलोन्मैल पायपीट करावी लागत आहे. रात्रीच्या वेळी जिथे कुठे पाण्याचा थेंब मिळेल तिथे हंडा लावून रात्र जागवावी लागत आहे.

**चारा छावण्या अन् 'रोहयो'ची कामे तातडीने सुरू करण्याची मागणी**

तालुक्यातील या गंभीर परिस्थितीची दखल घेऊन सरकारने तात्काळ पाटोदा तालुक्यात अधिकृत दुष्काळ घोषित करावा, जनावरांसाठी चारा छावण्या किंवा थेट चारा अनुदान सुरू करावे, टंचाईग्रस्त भागात टँकरची संख्या वाढवावी आणि महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची (रोहयो) कामे तातडीने सुरू करून मजुरांच्या हाताला काम द्यावे, अशी तीव्र मागणी तालुक्यातील ग्रामस्थांकडून केली जात आहे.

## पदवीधरांच्या प्रश्नांसाठी आयुष्यभर संघर्ष करणार -केशव दादाराव तांदळे

बीड । प्रतिनिधी

औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी मी केशव दादाराव तांदळे, रा. वंजारवाडी, ता. जि. बीड, माझा उमेदवारी अर्ज दाखल केला होता. आज बुधवार, दि. ७ ऑक्टोबर २०२६ रोजी झालेल्या छाननीमध्ये माझा उमेदवारी अर्ज वैध ठरला आहे. त्यामुळे पदवीधर बांधवांच्या हक्कासाठीच्या माझ्या लढ्याला आता अधिकृत स्वरूप प्राप्त झाले आहे.

मराठवाड्यातील प्रत्येक पदवीधर हा माझ्या कुटुंबातील सदस्य आहे, या भावनेतून मी ही निवडणूक लढवत आहे. पदवीधरांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देणे आणि त्यांच्या हक्कासाठी अहोरात्र झटणे हा माझा संकल्प आहे.

मराठवाड्यातील कला, क्रीडा, कार्यानुभव क्षेत्रात काम करणारे शिक्षक व कर्मचारी, कंत्राटी पद्धतीने सेवा देणारे पदवीधर, बेरोजगार पदवीधर युवक-युवती, महिला भगिनी तसेच विविध क्षेत्रांमध्ये कार्यरत असलेल्या पदवीधर बांधवांच्या प्रश्नांना प्राधान्य देण्यात येईल.कंत्राटी व मानधनावर काम करणाऱ्या पदवीधरांना त्यांच्या सेवेला योग्य न्याय मिळावा, रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, बेरोजगार पदवीधरांना रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी मिळाव्यात, स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या युवकांना आवश्यक सुविधा मिळाव्यात आणि पदवीधरांचे शिक्षण, रोजगार, कौशल्यविकास व भविष्यातील प्रश्न शासन दरबारी प्रभावीपणे मांडले जावेत, यासाठी मी सातत्याने प्रयत्न करणार आहे.

ही निवडणूक केवळ एका उमेदवाराची नसून मराठवाड्यातील प्रत्येक पदवीधराच्या हक्काची आणि भविष्यासाठीची लढाई आहे. पदवीधरांच्या आशीर्वादाने आणि विश्वासाने या निवडणुकीत १०० टक्के विजय मिळवण्याचा माझा आत्मविश्वास आहे.

त्यामुळे मराठवाडा पदवीधर मतदारसंघातील सर्व पदवीधर बांधव-भगिनींना माझी नम्र विनंती आहे की, आगामी निवडणुकीत मला मतदानरूपी आशीर्वाद व साथ द्यावी आणि पदवीधरांच्या प्रश्नांसाठी काम करण्याची संधी द्यावी.

तसेच मराठवाड्यातील सर्व वर्तमानपत्रांचे संपादक, पत्रकार व माध्यम प्रतिनिधींना नम्र विनंती आहे की, पदवीधरांच्या हितासाठी सुरू केलेल्या या लढ्याची आणि माझ्या उमेदवारीची बातमी आपल्या वर्तमानपत्रात प्रसिद्ध करून मला सहकार्य करावे. आपल्या माध्यमातून हा आवाज अधिकाधिक पदवीधरांपर्यंत पोहोचेल, असा मला विश्वास आहे.असे केशव दादाराव तांदळे म्हणाले

# शिवाजीनगर पोलिसांची मटका जुगारावर धडक कारवाई

### दीड लाखांचा मुद्देमाल जप्त, दोन स्वतंत्र कारवायांत दोघांना पकडले

बीड । प्रतिनिधी

शहरातील अवैध जुगार व मटका व्यवसायाला आळा घालण्यासाठी पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्या सूचनेनुसार शिवाजीनगर पोलिसांनी धडक कारवाई केली आहे. धानोरा रोडवरील टी-पॉईंट परिसरात मंगळवारी (दि. ६ ऑक्टोबर) सायंकाळी करण्यात आलेल्या दोन वेगवेगळ्या कारवायांमध्ये पोलिसांनी एकूण १ लाख ५४ हजार ३० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी अवैध धंद्यांवर धाडी टाकून कडक कारवाई करण्याचे आदेश दिले होते. या आदेशानुसार, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख व उपविभागीय पोलीस अधिकारी राजीव नवले यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस



निरीक्षक शितलकुमार बल्लाळ यांच्या नेतृत्वाखाली पथकाने ही मोहीम राबवली. धानोरा रोड टी-पॉईंट येथे सायंकाळी पावणेसहाच्या (१७:४५) सुमारास पोलिसांनी पहिली कारवाई केली. यात आरोपी रफीक बेग चाँद बेग याच्याकडून रोख २,१३० रुपये, मटक्याची चिठ्ठी बुक, कार्बन आणि बॉलपेन जप्त करण्यात आले. त्यानंतर सायंकाळी सव्वासातच्या (१९:१५) सुमारास याच परिसरात दुसरी धाड टाकण्यात आली. यामध्ये आरोपी सुलतान खान सदाद पठाण याच्याकडून १,९०० रुपये रोख, जुगाराचे साहित्य आणि १ लाख ५० हजार रुपये किमतीची होंडा कंपनीची मोटारसायकल (क्र. चक२३ इए ९५८२) असा एकूण १ लाख ५१ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. दोन्ही प्रकरणांतील आरोपींवर महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम १२ (अ) अंतर्गत गुन्हे नोंदवून कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.

**कारवाई करणारे पथक**

ही कारवाई पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक माधव काटकर, पोलीस उपनिरीक्षक ज्ञानेश्वर धोत्रे, पोलीस हवालदार रवींद्र आघाव, पोलीस शिपाई सुरज वाघमारे आणि राजाभाऊ जाधव यांच्या पथकाने पार पाडली. शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध जुगार, मटका आणि इतर गैरकायदेशीर धंद्यांवर यापुढेही अशीच कठोर मोहीम सुरू राहील, असा इशारा पोलीस प्रशासनाने दिला आहे.

जाहिर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी तथा कार्यकारी दंडाधिकारी अंबड यांचे न्यायालय**

दुरध्वनी क्रमांक ०२४८३-२७५०२६

जा.क्र.२०२६/सेतु/कावि-१२३६ दिनांक-२५/०९/२०२६

अर्जदार श्रीमान/श्रीमती बाळासाहेब सुदाम वावरे रा.डोमलगाव ता. अंबड जि.जालना यांनी त्यांचे मयत वडील नामे सुदाम आश्राजी वावरे यांचा मृत्यू दि.२२/११/२०२४ रोजी झाला असून याची जन्म/ मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| | सुदाम आश्राजी वावरे | वडील | २२/११/२०२४ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक--/- /२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**टी.सी.हरवला आहे**

मी शेख नसीर महेमूद राहणार डांगे गल्ली गेवराई जिल्हा बीड

माझा जिल्हा परिषद शाळा क्रमांक २ इयत्ता दुसरी वर्गाचा शैक्षणिक दाखला दिनांक १ ऑक्टोंबर २०२६ गुरुवार रोजी सकाळी ११ ते १२ वाजेच्या दरम्यान बीड - गेवराई प्रवासात हरवला किंवा गहाळ झाला आहे. हा दाखला माझ्यासाठी खूप महत्त्वाचा आहे तरी कोणाला सापडल्यास खाली पत्त्यावर किंवा मोबाईलवर संपर्क साधावा.

**मो. नं. ९५ ७ ९ २ २ २ ५ ०**
**पत्ता:: मोमीनपुरा गेवराई गेवराई जिल्हा बीड.**

**टी.सी.हरवला आहे**

एकशिंगे सार्थक शांतीलाल या नावाचा जनता विद्यालय धानोरा शाळेमधील बारावी पास चा (टीसी) दाखला कडा ते धानोरा बस प्रवासात हरवला आहे सापडल्या संपर्क ८०१०२००९ २२

# दुष्काळाचा फटका : शेतीवर आधारित उद्योगधंद्यांना मोठा धक्का

## अनेक शेतीपूरक व्यवसाय अडचणीत

**संभाजीनगर । प्रतिनिधी**

**महाराष्ट्रात (विशेषत: मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र) पावसाची अनुपस्थिती आहे. ८३ तालुक्यांत दुष्काळाची स्थिती गंभीर आहे. यामुळे शेतीवर आधारित उद्योगधंद्यांना मोठा धक्का बसला आहे. सर्वात मोठा आघात कुक्कुटपालन (पोल्ट्री) व्यवसायाला लागला आहे.**

मका हा कुक्कुटपालन व्यवसायातील मुख्य पशुपालखाद्याचा आधार आहे. दुष्काळामुळे मका उत्पादनात मोठी घट झाली आहे. देशभरात (महाराष्ट्रसह) मक्याचा अभाव निर्माण झाला आहे. त्यामुळे मक्याचे भाव वाढले आहेत (काही भागात प्रतिकिलो ३०+ पर्यंत). याची कुक्कुटपालकांना साखर उष्णता वाढत आहे. याचा थेट परिणाम: पोल्ट्री फार्म्समध्ये मुर्ग्या पालनाची लागत वाढली. काही व्यवसायात उत्पादनात घट, मृत्यूत वाढ किंवा शेअरधारी व्यवसाय बंद होण्याची शक्यता वाढली आहे.



**इतर शेती-आधारित उद्योगधंद्यांनाही फटका :**

पिकांसाठी पाण्याचा अभाव. पीक उत्पादन घटले. यामुळे पिकांचा भावही प्रभावित होतो. दूध, व्यवसायातही पाणी आणि पशुपालखाद्याची मागणी वाढली, पण पुरवठा मर्यादित.

**कुक्कुटपालन व्यवसायातील स्पष्ट अडचण :**

महाराष्ट्रात दरमहा ३.५ कोटी कोंबड्यघा पालवल्या जातात. त्यातून मुंबईसह देशभरात लाखो किलो चिकन सप्लाय केले जाते. दुष्काळात खर्च वाढल्याने छोट्या-मध्यम पोल्ट्री फार्म्स अडचणीत पडत आहेत. काही भागात (उदा. पुणे, लासलगाव) व्यवसाय थांबण्याची भीती किंवा कमी उत्पादन. याचा विस्तार: शेती-आधारित उद्योग (जसे फळबागेतील प्रक्रिया, मांस प्रोसेसिंग) यांना बाजारात मागणी घटल्याने थेट नुकसान.

**निष्कर्ष आणि सल्ला :**

दुष्काळ हा केवळ शेतकऱ्यांचा नाही, संपूर्ण शेती-आधारित अर्थव्यवस्था (पोल्ट्रीसह) यांचा आहे. कुक्कुटपालन हा ग्रामीण रोजगाराचा मोठा घटक असल्याने, त्याला मोठा धक्का बसला आहे.

**उद्योगधंदे आणि शेतकरी :**

पशुपालखाद्यांच्या पर्याय (जसे सस्ते सोयाबीन). जलशुद्धीकरण, पाणी संरक्षण, सूखा-विक्रमी पिके लावा. सरकारी योजनांचा फायदा घ्या (कर्ज, सबसिडी, पशुपालखाद्य पुरवठा). लहान व्यवसाय असल्यास पोल्ट्री फार्म्स सुरक्षित ठेवण्यासाठी आधुनिक व्यवस्थापन करा.

# पशुंच्या आहारात हिरव्या चाऱ्याचे महत्व



**महाराष्ट्रात पशुपालन व दुग्ध व्यवसाय हा शेतीला पूरक जोडधंदा तसेच अधिक उत्पन्न व आर्थिक स्थैर्य देणारा व्यवसाय म्हणून ओळखला जातो. दुग्ध व्यवसायात मिळणारे उत्पादन हे पशुच्या अनुवांशिकतेवर आणि त्याला देण्यात येणार्या संतुलित आहारावर अवलंबून असते. शेतकऱ्यांमध्ये चारा पिकांच्या सुधारित वाणांच्या लागवडीबाबत असलेल्या अज्ञानामुळे बहुतेक ठिकाणी हिरव्या चाऱ्याची कमतरता ३५ ते ४० टक्के पर्यंत दिसून येते.**

ज्वारी, मका, बाजरी, चवळी, संकरित नेपिअर, मारवेल गवत, मद्रास अंजन, स्टायलो असा वेगवेगळ्या प्रकारचा हिरवा चारा महाराष्ट्रात आढळून येतो.

**दर्जेदार हिरव्या चाऱ्याचे महत्त्व:**

जनावरांची निरोगी वाढ व प्रजनन क्षमता टिकवण्यासाठी हिरवा चारा आवश्यक आहे. हिरवा चारा चवदार व पाचक असल्याने आहारातील महत्त्वाचे घटक नैसर्गिक स्वरुपात उपलब्ध झाल्याने जनावराचे शरीराच्या कोणत्याही अवयवावर ताण न येता पचन होते व तापमान नियंत्रित राहण्यास मदत होते. जनावरांच्या आहारात हिरव्या चाऱ्याची कमतरता असल्यास उत्तम खुराक देऊन सुध्दा जनावरांचे उत्पादनक्षम वय व उत्पादन यावर विपरीत परिणाम होवू शकतो. दर्जेदार हिरव्या चारा अभावी गाभण गायींना कमजोर व रोगट वासरे निपजतात. आहारात जास्त प्रमाणात खुराक व कमी प्रमाणात हिरवा चारा असे प्रमाणे जास्त काळ राहिल्यास जनावरांच्या पचन संस्थेवर विपरीत परिणाम होतो.

**जनावरांना असा द्या हिरवा चारा**

वरील बाबींचा विचार करून पूर्ण वाढ झालेल्या जनावरास (४०० किलो वजन) गाईला सरासरी २० ते २५ किलो हिरवा चारा (निम्मा एकदल म्हणजेच मका, ज्वारी, बाजरी, संकरित नेपीअर अथवा गवते व निम्मा व्दिदल चारा म्हणजे लसुण घास, बरसीम, चवळी, स्टायलो तसेच ५ ते ६ किलो कोरडा चारा (कडबा, वाळलेले गवत, गव्हाचा भुसा, सरमाड इ.) रोज द्यावा. त्याचबरोबर १.५ ते २.० किलो खुराक, ३० ते ४० ग्रॅम खनिज मिश्रण व दिवसातून २ ते ३ वेळेस पाणी पाजावे, चारा शक्यतो कुट्टी करून द्यावा म्हणजेच चारा वाया जाण्याचे प्रमाण कमी होईल, तसेच चाऱ्याचे पचन चांगले होऊन चारा खाण्यासाठी लागणारी उर्जा कमी प्रमाणात लागेल.



# रब्बी हंगामातील भेंडी लागवड; जाणून घ्या संपूर्ण माहिती

**रब्बी हंगाम सुरू होणार आहे. या हंगामात शेतकरी बराच भाजीपाला लागवड करतात. या पिकामध्ये भेंडी ही मुख्य भाजी मानली जाते. याची देशभरात मोठी मागणी आहे. भेंडी लागवडीपासून शेतकरी एका हंगामात चांगले उत्पन्न मिळवू शकतात. या हंगामात भेंडीची लागवड केल्याने भेंडीचे झाड लहान राहते आणि जलद उत्पन्न देते.**

**प्रगत वाण :** परभणी क्रांती, पुसा सावनी, पंजाब पद्मिनी, पूजा ए -४, आर्का भय, अर्का अनामिका, पंजाब -७, पंजाब -१३ भेंडी/

**योग्य जमीन :** भेंडीची लागवड सर्व प्रकारच्या मातीमध्ये करता येते, परंतु चिकणमाती, बाळूई चिकणमाती आणि मटियार लोम माती अधिक उत्पादनासाठी योग्य मानली जातात.

**बियाणे प्रक्रिया :** यासाठी बिया २४ ते ३६ तास पाण्यात भिजत ठेवल्या जातात. यानंतर त्या सावलीच्या जागी सुकत ठेवा. बियाणे पेरण्यापूर्वी कोणत्याही बुरशीनाशकात प्रति किलो २ ग्रॅम दराने चांगले मिसळावे.

**बियाण्याचे प्रमाण :** उन्हाळी हंगामात भेंडीच्या लागवडीसाठी २० किलो तर पावसाळ्याच्या लागवडीसाठी प्रति हेक्टरी १२ किलो बियाणे आवश्यक आहे.

**पेरणीची पद्धत :** भेंडी पेरताना एका रांगेपासून दुसऱ्या रांगेचे अंतर ३० सेमी आणि एका रोपांचे ते दुसऱ्या रोपाचे अंतर १२ ते १५ सें.मी. असावे.

**सिंचन :** संपूर्ण शेताला योग्य आकाराच्या पट्ट्यामध्ये विभागून घ्या जेणेकरून सिंचनामध्ये सोयीचे होईल. पावसाळ्यात पाणी साचू नये म्हणून भेंडीची पेरणी उंच बेडमध्ये करावी.

**कापणी :** सुमारे अडीच महिन्यांनी पीक कापणीसाठी तयार होते. तोडणीनंतर ३ ते ५ दिवस भेंडी खाण्यायोग्य असते, तर पुसा सावनी ह्या प्रकारात हा कालावधी ७ दिवस असतो.

**उत्पादन :** योग्य तंत्राने भेंडीची लागवड केल्यास प्रति हेक्टरी ११५ ते १२५ क्विंटल उत्पादन मिळू शकते. शेतकरी बांधवांना यातून चांगले उत्पन्न मिळू शकते.

# कंदमाशीला आळा घालण्यासाठी करा असे उपाय

कंदमाशी ही हळद पिकावरील नुकसान करणारी प्रमुख कीड आहे. कंदमाशीचा प्रौढ डासासारखा परंतु मुंगळ्याप्रमाणे आकाराने मोठा व काळसर रंगाचा असतो. प्रौढ माशीचे पाय शरीरापेक्षा लांब असतात. पायांची पुढील टोके पांढऱ्या रंगाची असतात. दोन्ही पंख पातळ व पारदर्शक असून, त्यांच्यावर राखाडी रंगाचे दोन ठिपके असतात. ज्या ठिकाणी हळदीचे कंद उघडे पडलेले असतील त्या ठिकाणी जमिनीलगत प्रौढ माशी अंडी देते व अशा अंड्यातून अळ्या बाहेर पडून उघडच्या गड्डयामध्ये शिरून त्यांच्यावर उपजीविका करतात. अशा गड्डयामध्ये नंतर बुरशीजन्य रोगांचा आणि काही सुत्रकृमींचा शिरकाव होतो. त्यामध्ये खोड व गुद्दे मऊ होतात व त्यांना पाणी सुटून ते कुजतात. जास्ती दिवस लांबलेला पावसाळा कंदमाशीसाठी अधिक प्रमाणात अनुकूल असतो. वेळीच लक्ष दिले नाही तर या कीडीमुळे हळद पिकामध्ये ४५ ते ५० टक्के नुकसान होते. ही कीड जुलै-ऑगस्ट ते पिकाच्या काढणीपर्यंत नुकसान करते.

**व्यवस्थापनाचे उपाय :** जुलै ते ऑक्टोंबरपर्यंत १५ दिवसांच्या अंतराने क्विनालफॉस २५% टक्के २० मि.ली. किंवा डायमिथोएट ३० टक्के १० मि.ली. प्रति १० लिटर पाणी या प्रमाणे सोबत चांगल्या दर्जाचे स्टिकर मिसळून आलटुन-पालटून फवारावे. उघडे पडेलेले कंद मातीने झाकून घ्यावेत. वेळेवर हळदीची भरणी करावी. तसेच जमिनीतून क्लोरपायरीफॉस ५० टक्के ५० मि.लि. प्रति १० लिटर पाणी या प्रमाणात घेऊन आळवणी करावी. याच पद्धतीने आळवणी एक महिन्याच्या अंतराने प्रत्येक महिन्यात एकदा करावी. कंदमाशी मुळे कंद कूज झाली असल्यास मुख्य किटकनाशकासोबत एका बुरशीनाशकाची तज्ञांच्या सल्ल्याने मिसळून आळवणी



करावी. त्याचबरोबर एकरी २-३ पसरट तोंडाची भांडी वापरून प्रत्येक भांड्यात एरंडीचे २०० ग्रॅम भरडलेले बी घेऊन त्यात १ ते १.५ लिटर पाणी घ्यावे. ८ ते १० दिवसांनी या मिश्रणामध्ये तयार होणाऱ्या विशिष्ट गंधाकडे कंदमाशीचे प्रौढ आकर्षित होतात व त्यात पडून मरतात. हळद पीक काढल्यानंतर शेतात राहिलेल्या पिकांचे अवशेष, सडके कंद जमा करून नष्ट करावेत. अशाप्रकारे कंद माशीच्या प्रादुर्भावास वेळीच लक्ष देऊन व्यवस्थापनविषयी योग्य उपायोजना करून भविष्यात होणारे नुकसान टाळावे. हळद पिकावर केंद्रीय कीटकनाशक मंडळातर्फे लेबल क्लेम नसल्याने विद्यापीठ शिफारशीत संशोधनाचे निष्कर्ष दिले आहेत.

# उसावर पाकोळ्यांचे संकट

**यंदा पावसाने पाठ फिरवल्याने खरीप हंगाम अडचणीत आला. मूग-उडदावर मावा, सोयाबीनला पाण्याची कमतरता आणि कापसावर फकडीच्या प्रादुर्भावानंतर आता तुलनेने सुरक्षित मानल्या जाणाऱ्या उसालाही नवे संकट निर्माण झाले आहे.**



उसावर पानातील रस शोषणाऱ्या पाकोळ्यांचा प्रादुर्भाव झाल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. पाकोळ्यांमुळे उसाची वाढ आणि गाभ्याची वाढ प्रभावित होण्याची शक्यता असल्याने शेतकरी आता उपाययोजनांकडे पाहत आहेत. पाण्याअभावी सोयाबीन वाळून गेले, तर पाणी उपलब्ध असलेल्या कापसावर फकडीचा प्रादुर्भाव होऊन पातेगळ सुरू झाली आहे. ज्या शेतांमध्ये पाणी उपलब्ध नाही, तेथील कापसाची वाढही समाधानकारक झालेली नाही. काही ठिकाणी लागलेली बोंडे सुकून गळून पडत आहेत. फळबागांवरही पाण्याच्या टंचाईचे सावट आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना उसाचे पीक तुलनेने आधार देईल, अशी अपेक्षा होती. मात्र, आता उसावरही पाकोळ्यांचे संकट घोंगावत असल्याने शेतकऱ्यांची चिंता आणखी वाढली आहे.

**उसाला पाणी देताना पाकोळ्यांचे मोहळ :**

उसाला पाणी देण्यासाठी शेतात गेल्यानंतर पाकोळ्यांचे मोठ्या प्रमाणात मोहळ घोंगावत असल्याचे ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी सांगितले. पाकोळ्या उसाच्या पानातील रस शोषून घेत असल्याने पिकाच्या वाढीवर परिणाम होण्याची भीती आहे. आधीच पाण्याची कमतरता असताना आता किडीचा प्रादुर्भाव वाढल्याने उसाची जोपासना करणे शेतकऱ्यांसाठी अधिक कठीण झाले आहे.

**पाकोळीमुळे उसाच्या वाढीवर परिणाम :**

उसावरील पाकोळी ही रसशोषक कीड असून ती पानांमधील रस शोषून घेते. त्यामुळे पानांची कार्यक्षमता कमी होऊन त्याचा परिणाम ऊसाच्या वाढीवर होऊ शकतो. आधीच पाण्याचा ताण असलेल्या उसामध्ये या किडीचा प्रादुर्भाव वाढल्यास पिकाच्या वाढीवर अधिक परिणाम होण्याची शक्यता शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

**कृषी विभागाचा फवारणीचा सल्ला:**

उसावरील पाकोळ्यांचा प्रादुर्भाव लक्षात घेता शेतकऱ्यांनी योग्य कीड नियंत्रणाची उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे कृषी विभागाने सांगितले आहे की, उसावरील पाकोळी म्हणजे शुगरकेन पायरीला असून ती पानातील रस शोषून घेते. त्यामुळे उसाच्या वाढीवर परिणाम होतो. प्रादुर्भावाच्या परिस्थितीत क्लोरोपायरिफॉस व सायपरमेथ्रीन किंवा सोलोमन या औषधांची फवारणी करावी.

**दुष्काळात उसावर कीड संकट:**

यदाच्या हंगामात शेतकरी आधीच पावसाच्या कमतरतेमुळे अडचणीत आहेत. खरीप पिकांचे नुकसान, पाण्याची टंचाई आणि फळबागांवरील संकटानंतर आता उसावर पाकोळ्यांचा प्रादुर्भाव झाल्याने उत्पादन टिकवण्याचे आव्हान निर्माण झाले आहे. पाण्याची उपलब्धता असलेल्या शेतकऱ्यांनी ऊसाचे पीक घेतले असले, तरी आता पाणी आणि किडीचे दुहेरी संकट त्यांच्यासमोर उभे राहिले आहे. त्यामुळे प्रादुर्भाव वाढण्यापूर्वी शेतकऱ्यांनी कृषी विभागाच्या मार्गदर्शनानुसार उपाययोजना करण्याची गरज आहे.

## दिन विशेष

### जागतिक दिवस
### वेद दिन

### महत्वाच्या घटना

१६७९ : सिद्दी जौहर आणि इंग्रजांचा मारा रोखत मराठ्यांनी खांदेरी किल्ल्याभोवती एक मीटर उंचीचा तट उभारून पूर्ण केला.
१८१४ : दुसर्या बाजीरावाने पांडुरंग कोल्हटकराच्या साहाय्याने 'उंदेरी-खांदेरी' किल्ल्यांचा ताबा परत मिळवला.
१८२२ : ब्राझिलला (पोर्तुगालपासुन) स्वातंत्र्य मिळाले.
१९०६ : 'बँक ऑफ इंडिया'ची स्थापना झाली. ही भारतात स्थापन झालेली पहिली स्वदेशी व्यापारी बँक आहे.
१९२३ : आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी पोलिस आयोग (आय. सी. पी. सी) ची स्थापना व्हीयना येथे करण्यात आली.
१९३१ : दुसर्या गोलमेज परिषदेची सुरूवात झाली.
१९७८ : मधुमेह नियंत्रित करण्यासाठी उपयोगी पडणारे इन्सुलिन प्रथमच जनुक अभियांत्रिकी पद्धतीने तयार करण्यात यश.
१९७९ : दिवाळखोरी टाळण्यासाठी 'ख्रायसलर कॉर्पोरेशन'ने अमेरिकन सरकारकडे १ बिलियन डॉलर्सची मागणी केली.
२००५ : इजिप्तमधे पहिल्यांदाच बहुपक्षीय सार्वत्रिक निवडणुका घेण्यात आल्या.
२००९ : भारतीय बिलियर्डस खेळाडू पंकज अडवाणी यांनी वर्ल्ड प्रोफेशनल बिलियर्ड्सचे जेतेपद जिंकले.
२०१८ : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नवी दिल्ली येथे नीती आयोग द्वारे आयोजित वैश्विक गतिशीलता शिखर संमेलनाचे उद्घाटन केले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७९१ : उमाजी नाईक पहिला क्रांतिकारक स्वातंत्र्यसैनिक (मृत्यू: ३ फेब्रुवारी १८३२)
१८०७ : न्यूझीलंड देशाचे पहिले पंतप्रधान हेन्री सिवेल यांचा जन्म. (मृत्यू: १४ मे १८७९)
१८८७ : साहित्य अकादमी पुरस्कार व पद्मविभूषण पुरस्कार सन्मानित प्रख्यात भारतीय संस्कृत विद्वान आणि महान दार्शनिक संस्कृत-तंत्र अभ्यासक, भारतीय शास्त्रज्ञ आणि तत्वज्ञ गोपीनाथ कविराज यांचा जन्मदिन.
१८२२ : रामकृष्ण विठ्ठल तथा भाऊ दाजी लाड प्राच्यविद्या पंडित, पुरातत्त्वज्ञ, कर्ते समाजसेवक आणि कुशल धन्वतंरी, ग्रँट मेडिकल कॉलेजच्या पहिल्या तुकडीतील विद्यार्थी (मृत्यू: ३१ मे १८७४)
१८२६ : बंगाल नवजागृतीचे प्रसिद्ध भारतीय बंगाली भाषिक लेखक राजनारायण बसु यांचा जन्मदिन.
१८४९ : बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर हिन्दुस्तानी शास्त्रीय गायक, ग्वाल्हेर गायकीचा महाराष्ट्रात प्रचार केला (मृत्यू: ८ फेब्रुवारी १९२७)
१९१२ : डेव्हिड पॅकार्ड ह्युलेट पॅकार्ड कंपनीचे एक संस्थापक (मृत्यू: २६ मार्च १९९६)
१९१५ : डॉ. महेश्वर नियोग प्रख्यात आसामी साहित्यिक आणि इतिहासकार, पद्मश्री (१९७४), आसाम साहित्य परिषदेचे अध्यक्ष (मृत्यू: १३ सप्टेंबर १९९५)
१९१७ : पद्मभूषण पुरस्कार सन्मानित भारतीय चिकित्सक व वैज्ञानिक बानो जहाँगीर कोयाजी यांचा जन्मदिन.
१९२५ : भानुमती रामकृष्ण तामिळ व तेलगू चित्रपटांतील अभिनेत्री, दिग्दर्शक, निर्माती, गीतकार, संगीतकार, गायिका व लेखिका (मृत्यू: २४ डिसेंबर २००५)
१९३३ : इला भट्ट मॅगसेसे पारितोषिक विजेत्या समाजसेविका, वकील व 'सेवा' ' या संस्थेच्या संस्थापिका
१९३४ : सुनील गंगोपाध्याय बंगाली कवी व कादंबरीकार (मृत्यू: २३ आक्टोबर २०१२)
१९३४ : बी. आर. इशारा चित्रपट दिग्दर्शक आणि पटकथालेखक (मृत्यू: २५ जुलै २०१२)
१९४० : चंद्रकांत खोत लेखक व संपदक
१९६३ : अशोकचक्र पुरस्कार सन्मानित शूरवीर भारतीय वैमानिक नीरजा भनोट यांचा जन्मदिन.
१९६७ : भारतीय-इंग्लिश अकाउंटंट आणि राजकारणी आलोक शर्मा यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६०१ : विल्यम शेक्सपियर यांचे वडील जॉन शेक्सपियर यांचे निधन.
१८०९ : थायलंडचा राजा बुद्ध योद्फा चुलालोके यांचे निधन.
१९५३ : भगवान रघुनाथ कुळकर्णी ऊर्फ 'फुलारी' ऊर्फ 'बी. रघुनाथ' लेखक व कवी (जन्म: १५ ऑगस्ट १९१३)
१९७९ : जनार्दन ग्यानोबा तथा 'जे. जी.' नवले भारतीय कसोटी क्रिकेट संघाचे पहिले यष्टिरक्षक(जन्म: ७ डिसेंबर १९०२)
१९९१ : रवि नारायण रेड्डी 'कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया' चे सहसंस्थापक (जन्म: ५ जून १९०८)
१९९४ : टेरेन्स यंग, चिनी इंग्लिश दिग्दर्शक आणि पटकथाकार (जन्म: २० जून १९१५)
१९९७ : मुकूल आनंद तांत्रिक करामतीचे जादूगार म्हणून नाव कमावलेले हिन्दी चित्रपट निर्माते व दिग्दर्शक (जन्म: ११ आक्टोबर १९५१)
१९९८ : गुजरात, मध्य प्रदेश आणि पॉन्डिचेरी या केंद्र शासित प्रदेशाचे माजी राज्यपाल के. एम चांडी यांचे निधन.
२०१३ : भारतीय परराष्ट्र सचिव, दिल्ली, अंदमान आणि निकोबार बेटांचे माजी उपराज्यपाल आणि त्रिपुरा, गोवा आणि उत्तर प्रदेश राज्यांचे माजी राज्यपाल रोमेश भंडारी यांचे निधन.



राज्य लोकतंत्र
गुरूवार दि.८ ऑक्टोबर २०२६ ५
मराठवाडा वृत्तांत



# विकसित भारताचा संकल्प म्हणजे योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्याचा संकल्प -लोणीकर

जालना । प्रतिनिधी

विकसित भारत सेवा संकल्प सभेच्या प्रसंगी जालना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष राहुल लोणीकर यांनी केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारच्या गेल्या १२ वर्षांतील विविध जनकल्याणकारी योजना आणि विकासकामांचा आढावा मांडला. 'सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास आणि सबका प्रयास' या मंत्राच्या माध्यमातून सेवा, सुशासन आणि जनकल्याणाला प्राधान्य देत शासनाच्या योजनांचा लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्याचे काम सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

ते सेनगाव जि हिंगोली येथे भारत संकल्प सभा व सेवाज्योत यात्रेच्या शुभारंभ प्रसंगी बोलत होते या वेळी खासदार रामराव वडकुते, आमदार प्रज्ञाताई सातव, भाजपा जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष शिवाजी मुटकुळे, यांची प्रमुख उपस्थिती होती

पुढे बोलताना,राहुल लोणीकर म्हणाले की, डीबीटी आणि आधार प्रमाणीकरणामुळे सरकारी योजनांमध्ये पारदर्शकता वाढली असून मोठ्या प्रमाणात बनावट लाभार्थी दूर झाले आहेत. गेल्या काही वर्षांत कोट्यवधी नागरिकांना विविध योजनांचा थेट लाभ मिळाला आहे. गरीब कल्याणाच्या दृष्टीने प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेतून ८१ कोटींपेक्षा अधिक नागरिकांना मोफत धान्याचा लाभ देण्यात आला. जनधन योजनेतून ५८ कोटींपेक्षा अधिक बँक खाती उघडण्यात आली असून त्यात मोठ्या प्रमाणावर महिला लाभार्थी आहेत.

शेतकऱ्यांसाठी प्रधानमंत्री किसान सन्मान निधी, किसान क्रेडिट कार्ड यांसह विविध योजनांच्या माध्यमातून आर्थिक आधार देण्यात आला आहे. पीएम-किसान योजनेतून ११ कोटींपेक्षा अधिक शेतकऱ्यांच्या खात्यांमध्ये थेट आर्थिक मदत जमा करण्यात आली आहे. तसेच घउउ ची कर्जमर्यादा वाढविण्यात आल्याने शेतकऱ्यांना अधिक सुलभतेने भांडवल उपलब्ध होत असल्याचे राहुल लोणीकर यांनी नमूद केले.



पुढे बोलताना राहुल लोणीकर म्हणाले की, महिला सक्षमीकरणासाठी उज्ज्वला योजना, लखपती दीदी, सुकन्या समृद्धी योजना यांसारख्या योजनांचा उल्लेख करताना त्यांनी सांगितले की, कोट्यवधी महिलांना स्वच्छ इंधन, आर्थिक स्वावलंबन आणि मुलींच्या भविष्यासाठी आर्थिक सुरक्षा मिळाली आहे. प्रधानमंत्री आवास योजनेतून कोट्यवधी कुटुंबांना पक्क्या घराचा आधार मिळाला असून आयुष्मान भारत योजनेतून गरीब व मध्यमवर्गीय नागरिकांना आरोग्य संरक्षण मिळाले आहे.

डिजिटल इंडिया आणि सुशासनाच्या माध्यमातून सरकारी योजनांच्या अंमलबजावणीत पारदर्शकता वाढली आहे. नेटच्या माध्यमातून ग्रामपंचायतींना ब्रॉडबँड कनेक्टिव्हिटी देण्यात आली असून ऋशाच् सारख्या डिजिटल व्यासपीठामुळे सरकारी खरेदी प्रक्रियेत पारदर्शकता वाढली आहे. वैद्यकीय शिक्षण, आरोग्य सुविधा, मिशन इंद्रधनुष, स्वच्छ भारत मिशन आणि जल जीवन मिशनच्या माध्यमातून देशाच्या मूलभूत सुविधांमध्ये मोठे परिवर्तन घडत असल्याचे राहुल लोणीकर यांनी सांगितले.

ते पुढे म्हणाले की, प्रधानमंत्री मुद्रा योजना, पीएम स्वनिधी, स्टँड अप इंडिया आणि प्रधानमंत्री विश्वकर्मा योजना यामुळे छोटे व्यावसायिक, फेरीवाले, पारंपरिक कारागीर तसेच अनुसूचित जाती-जमातीतील उद्योजकांना आर्थिक पाठबळ मिळाले आहे. या योजनांमुळे रोजगारनिर्मिती आणि स्वयंरोजगाराला चालना मिळत आहे.पुढे बोलताना लोणीकर यांनी केंद्राच्या योजनांचा लाभ सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचण्यासाठी विकासाभिमुख आणि पारदर्शक शासनाची गरज असल्याचे सांगितले. गरीब कल्याण, महिला सक्षमीकरण, शेतकरी समृद्धी, डिजिटल परिवर्तन आणि सुशासनाच्या आधारावर विकसित भारताचा संकल्प साकार करण्याच्या दिशेने देशाची वाटचाल सुरू आहे, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. शेवटी राहुल लोणीकर म्हणाले की, मोदी सरकारची १२ वर्षांची वाटचाल ही केवळ योजनांची आकडेवारी नसून 'विकसित भारत' घडविण्याच्या संकल्पाची पूर्तता करण्याच्या दिशेने सुरू असलेला ऐतिहासिक प्रवास आहे.

कार्यक्रमाला माजी जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, सरचिटणीस उमेश नागरे शंकर बोरुडे पप्पू चव्हाण, डॉ रवी पाटील माणिकराव लोंढे कांताराम कोटकर, गिरीश तोष्णीवाल विलासराव जाधव भानुदास राव पवार शहराध्यक्ष रणजीत पुरोहित उफाड यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिकांची उपस्थिती होती

## ग्रामरोजगार सेवक शहादेव खेडकर चौकशी समितीमध्ये स्पष्ट निर्दोष

### आरोप करणारे राजकीय विरोधक;तथ्यहीन आरोप

पाथर्डी । प्रतिनिधी

पाथर्डी तालुक्यातील एकनाथवाडी ग्रामपंचायत येथे कार्यरत असलेले ग्रामरोजगारसेवक शहादेव खेडकर याच्या प्रसारित झालेल्या ऑडियो क्लिप मूळे प्रचंड खळबळ उडाली होती गायगोठा विहीर मंजुरी घरकुल घोटाळा अश्या अनेक योजनेतील गैरव्यवहार प्रकरणी शहादेव खेडकर यांच्यावर कारवाईची मागणी केवळ गावठी व भावकीच्या वादातून सूडबुद्धीने करण्यात आली असून माझी जनमानसात असलेली प्रतिमा मलीन करण्यातचे षडयंत्र सिद्धार्थ खेडकर याने रचले आहेत असा खळबळजनक आरोप ग्रामरोजगारसेवक शहादेव खेडकर

> एआय पुरस्कृत बनावट व फेक बातम्या प्रसारित करून सीईओ आनंद भंडारी यांनी शहादेव खेडकर यांना बडतर्फ केल्याच्या खोट्या बातम्या पसरवल्या जात असून अशी कुठलेही सीईओ आनंद भंडारी यांनी लेखी आदेश दिले नाहीत मी ग्रामरोजगार सेवक पदाचा दुरुपयोग केला नाही कुणाकुणाही पैसे घेतले नाहीत ज्या शासकीय योजनेचा लाभ मिळाला आहे तो कायदेशीर नियमानुसार मिळाला आहे कुठल्याही गैरव्यवहारात माझा दूरपर्यंत संबंध नाही
> (शहादेव खेडकर ग्रामरोजगारसेवक एकनाथवाडी)

ग्रामरोजगार सेवक शहादेव खेडकर यांची चौकशी पंचायत समिती पाथर्डी विस्तार अधकारी दत्तात्रय रानमाळ व त्यांच्या पथकाने पूर्ण केली असून गावातील ३० ते ३५ लोकांचे समक्ष जबाब घेतले गेले शहादेव खेडकर यांनी कुठल्याही वैयक्तिक व शासकीय लाभाच्या योजनेसाठी कुणाकडूनही पैसे घेतल्याचे पुरावे किंवा तसे जबाब दिले नाहीत त्यामुळे ग्रामरोजगार सेवक शहादेव खेडकर यांच्या चौकशीचा अहवाल वरिष्ठांना पाठवला आहे शहादेव खेडकर यांची चौकशी निष्पक्ष पूर्ण झाली असून चौकशीमध्ये ते दोषी नाहीत
(दत्तात्रय रानमळ विस्ताराधिकारी पं.स.पाथर्डी)

यांनी केला आहे ग्रामरोजगार सेवक शहादेव खेडकर मी स्वतः घरात ३ घरकुल मिळवले हा आरोप दिशाभूल करणारा चुकीचा व निरर्थक आहे पीएम आवास योजनेतील यादीतील माझ्या वडिलांचे घरकुल मंजूर असून त्याचे काम प्रगतीपथावर आहे पीएम आवास ऑनलाईन घरकुल सर्वे मध्ये माझे नाव आले असून ते घरकुल अजून मंजूर व्हायचे आहे तसेच मी कुठल्याही शासकीय वैयक्तिक लाभाच्या इतर योजनेचा लाभ घेतला नाही जे ट्रॅक्टर आहे ते वैयक्तिक पैशातून खर्च करून विकत घेतले असल्याचे पुरावे देखील आपल्याकडे असल्याचे शहादेव खेडकर यांनी सांगितले आहे.

## दुष्काळामुळे मायक्रो फायनान्सच्या सक्तीच्या वसुलीला स्थगिती द्या: निवासी उपजिल्हाधिकारी यांना निवेदन

जालना । प्रतिनिधी

जिल्ह्यात निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी, शेतमजूर आणि सर्वसामान्य नागरिक मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहेत. अशा परिस्थितीत मायक्रो फायनान्स कंपन्या आणि खाजगी वित्तीय संस्थांकडून सुरू असलेल्या कर्जाच्या सक्तीच्या वसुलीला वर्षभरासाठी तात्काळ स्थगिती देण्यात यावी, या मागणीचे निवेदन अखिल भारतीय ग्राहक पंचायतीच्या वतीने निवासी उपजिल्हाधिकारी मा. श्री. शशिकांत हातगल यांना सादर करण्यात आले.

या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, दुष्काळामुळे ग्रामीण व शहरी भागातील नागरिकांचे आर्थिक गणित पूर्णपणे कोलमडले आहे. असे असतानाही विविध मायक्रो फायनान्स कंपन्या, बँका आणि खाजगी सावकारी संस्थांचे वसुली कर्मचारी कर्जदारांना वेळे-अवेळी घरी जाऊन, फोनवरून धमकावून अपमानास्पद वागणूक देत आहेत. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या (RBI) मार्गदर्शक नियमांचे सर्रास उल्लंघन करून केली जाणारी ही सक्तीची वसुली तात्काळ थांबवून किमान वर्षभरासाठी स्थगिती देण्यात यावी, अशी आग्रही मागणी प्रशासनाकडे करण्यात आली.त्याच बरोबर दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांना कोर्ट फी मध्ये माफी द्यावी अशीही मागणी करण्यात आली.हे निवेदन सादर



करताना अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे जिल्हाध्यक्ष डॉ. रमेश तारगे यांच्यासह मा. ड. डी. पी. पाटील, ड. महेश धन्नावत, ड. वसीम शेख, डॉ. देवराव चौरे, बाबासाहेब हेमके, सुनील राखुडे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी श्री. शशिकांत हातगल यांनी निवेदनाची गांभीर्याने दखल घेत नियमबाह्य व सक्तीची वसुली करणाऱ्या संस्थांवर योग्य ती कारवाई करण्याचे आश्वासन दिले.

## जल्लोष २०२६ वादविवाद स्पर्धात बाबुजी आव्हाड महाविद्यालयाचे यश

पाथर्डी । प्रतिनिधी

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे विद्यार्थी विकास मंडळ व भाऊसाहेब संतुजी थोरात महाविद्यालय संगमनेर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय युवक महोत्सव जल्लोष २०२६ मध्ये बाबुजी आव्हाड महाविद्यालयाने पथनाट्य प्रहसन मुक नाटक पोस्टर, वादविवाद वक्तृत्व स्पर्धेत सहभागी घेतला विद्यार्थ्यांनी उत्तम सादरीकरण केले अहिल्यानगर जिल्ह्यातील विविध महाविद्यालयातील विद्यार्थी सहभागी झाले होते वादविवाद स्पर्धात कु.पुनम सुरेश डमाळे व



ओमकार ब्राह्मदेव शिरसाठ यांनी तृतीय क्रमांक पटकावला त्यांची विद्यापीठ स्तरावरील युवक महोत्सवासाठी निवड झाली त्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष अभय आव्हाड उपाध्यक्ष सुरेशराव आव्हाड महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बबन चौरे यांनी अभिनंदन केले या संघाचे नेतृत्व सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ अशोक डोळस डॉ.वैशाली आहेर डॉ.आनंद घोंगडे डॉ.अर्जुन केरकळ प्रा.दादा बडे यांनी केले या युवक महोत्सवात एकूण २० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

## गोंदी पोलीसांकडुन वाळु तस्करावर स्थानबध्दतेची कारवाई

अंबड । प्रतिनिधी

शरिराविरुध्दच्या गुन्हयातील आरोपी वाळु तस्कर संतोष कांबळे वय ३० वर्षे रा. गोंदी ता. अंबड जि. जालना याचेवर पोलीस ठाणे गोंदी येथे जिवे ठार मारण्याचा प्रयत्न करणे, वाळु चोरी करणे, अवैध वाळु तस्करी करणे, जीवे मारण्याच्या धमक्या देणे, सार्वजनिक रस्त्यावर सामान्य लोकांना मारहाण करणेबाबतचे गुन्हे दाखल असुन इसमावर प्रतिबंधात्मक कारवाई करुनही त्याचे वर्तनात काही एक फरक पडत नसल्याने इसम नामे संतोष सखाराम कांबळे वय ३० वर्षे याचेवर महाराष्ट्र झोपडपट्टी गुंड, हातभट्टीवाले, औषधी द्रव्य विषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती, दृकश्राव्य कलाकृतीचे विनापरवाना प्रदर्शन करणाऱ्या व्यक्ती (व्हिडीओ पायरेट्स), वाळु तस्कर आणि अत्यावश्यक वस्तुंचा काळा बाजार करणाऱ्या व्यक्ती यांच्या विघाकत कृत्यांना आळा घालण्याबाबत अधिनियम १९८१ कलम ३(१) अन्वये स्थानबध्दता करण्याबाबत मा. वरीष्ठांच्या मार्फतीने प्रस्ताव पाठवला होता. त्यास मा. जिल्हादंडाधिकारी यांनी सदर प्रस्तावाला दिनांक ०१/१०/२०२६ रोजी मंजुरी दिली होती. त्याप्रमाणे सदर गुन्हयातील आरोपी हा गोंदी पोलीस ठाणे गु.र.क्र.२५२/२०२६ कलम १०९ (१), ११५(२),१२१(१),१ ३२,१८९(२), १९०,१९१(२),३०३(२),३२४ (४) इतर भा. न्या. सं या गुन्हयातुन मा. कोर्टाचे आदेशान्वये जिल्हा कारागृह जालना येथे न्यायालयीन कोठडीतुन ताब्यात घेवुन त्यास मा. जिल्हाधिकारी सो जालना यांचे स्थानबध्द आदेशाची बजावणी करुन सदर इसमास ०१ वर्षाकरीता मध्यवर्ती कारागृह, छत्रपती संभाजीनगर या ठिकाणी दाखल करण्यात आले आहे.




सदरची कारवाई मा.श्री तेगबीर सिंह संधु पोलीस अधिक्षक , मा.श्री विक्रम साळी, अपर पोलीस अधिक्षक , मा.श्री सिध्देश्वर धुमाळ उपविभागीय पोलीस अधिकारी अंबड, यांच्या मार्गदर्शनाखाली गोंदी पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी सपोनि अमोल गुरले, पोउपनि बालाजी पद्माने, पो.शि १६२५ नितीन खरात, पो.शि ८०४ ज्योतीलाल राठोड व पो.ह. रुस्तुम जैवाळ, पो.शि राऊत स्था.गु.शा जालना यांनी केली आहे.

जा. क्र- १९२७ दि-०१/१०/२०२६
जिल्हा तक्रार निवारण न्यायमंच बीड जिल्हा कार्यालय
शाहूनगर पांगरी रोड, बीड ४३११२२

**जाहीर प्रगटन**

CONSUMER CASE NO. DC/470/CC/227/2023
LAXMAN RANGNATH CHANGAN
....Petitioner/-ppellant
Versus
JIJAU MA SAHEB MULTISTATE CO LI THROUGH ASHWINI SUNIL WANDHARE
To.
.....Opposite Party/Respondent(s)
Opposite Party / Respondent Name:
1. JIJ-U M- S-HEB MULTIST-TE CO LI THROUGH ASHWINI SUNIL WANDHARE RAJIV GANDHI CHOWK CANOL ROAD BEED TO DIST BEED, MAHARASHTRA BEED-
2. ANITA BABAN SHINDE RAJIV GANDHI CHOWK C-NOL RO-D BEED TO DIST BEED, MAHARASHTRA BEED-
3. SHOBHA SAKHARAM KHARSADE RAJIV GANDHI CHOWK CANOL ROAD BEED TQ DIST BEED, MAHARASHTRA BEED-

वर नमुद तक्रारदार यांना विरुध्द पक्ष यांच्या विरुध्द ग्राहक संरक्षण कायद्यान्वये वर नमुद तक्रार दाखल केलेली आहे. यातील विरुध्द पक्ष यांना नोटीस पाठविली असता ते स्विकारत नाही / पत्ता बदल झालयामुळे मिळुन येत नाही. म्हणून तक्रारदारांनी केलेल्या विनंतीनुसार या जाहिर नोटीस व्दारे आपणास कळविण्यात येते की, विरुध्द पक्ष यांनी वर नमुद या आयोगाच्या पत्यावर दिनांक ०७/१०/२०२६ रोजी सकाळी १०:३० वाजता स्वता. अगर वकिल किंवा प्राधिकृत प्रतिनिधि मार्फत उपस्थित राहून आपला लेखी जबाब, पुरावा व प्रतिज्ञालेख दाखल करावेत. जर विरुध्द पक्षांनी याकामी कसूर केल्यास मा. आयोगाव्दारे एकतर्फा आदेश पारित करणेत येवुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची दखल घ्यावी. मा. जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड यांची आदेशानुसार.

दिनांक ०२/०९/२०२६
ठिकाण - बीड

स्वाक्षरित
**प्रबंधक**
**जिल्हा ग्राहक तक्रार, निवारण आयोग, बीड.**

**जाहीर प्रगटन**

**मा. श्रीमती एम.पी. मर्ढेकर, ४ थे दिवाणी न्यायाधीश क.स्तर, बीड, ता.जि. बीड यांचे न्यायालयात किरकोळ दिवाणी अर्ज नंबर १८६६/२०२५ इंदुबाई जाधव व इतर वि. निरंक**

ज्यापेक्षा अर्जदार यांचा कि, दि. अर्ज नं. १७८/२०२४ मयत नामे आसाराम नानाभाऊ जाधव यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळणेकामीचा अर्ज मा. न्यायालयाने दि.०५.०९.२०२८ गंजी मंजुर केलेला आहे. आणि तसेच अर्जदार १ इंदुबाई आसाराम जाधव, वय ४९ वर्षे, धंदा घरकाम व शेती, २.नानाभाऊ आसाराम जाधव, वय ३८ वर्षे, धंदा शेती, १ व २ रा. मन्यारवाडी, ता. जि. बीड.३.तुकाराम आसाराम जाधव (मयत) वारस, ३.१. अश्विनी तुकाराम जाधव, वय २९ वर्षे, धंदा घरकाम व शेती, ३.२. कल्याणी तुकाराम जाधव, वय १० वर्षे, ३.३. पुनम तुकाराम जाधव, वय ०७ वर्षे, अज्ञान अर्जदार कं.३.२ व ३.३ करीता अ.पा.क. आई अर्जदार कं. ३.१. सर्व अर्जदार कं. १ ते ३ रा. मन्यारवाडी, ता. जि. बीड.

अर्जदारांची मागणी कलम १५१ व १५२ दिवाणी प्रकीया संहितानुसार

असे की, अर्ज दाखल करते वेळी नजरचुकीने व टंकलेखनाच्या चुकीमुळे अर्जदार क्र. ३.२ व ३.३ करिता अ.पा.क. आई अर्जदार क्र. ३.१ ने ऐवजी अर्जदार क्र. २ व ३ करिता अ.पा.क. आई अर्जदार क्र.१ असे चुकीचे टंकलिखीत झालेले आहे. अर्जदार यांना निर्गमीत करावयाच्या वारस प्रमाणपत्रामध्ये अर्जदार क्र. २ व ३ करीता अ.पा.क. आई अर्जदार क्र. १ चे ऐवजी अर्जदार क्र. ३.२ व ३.३ करिता अ.पा.क. आई अर्जदार क्र. ३.१ असु दुरूस्त करून वारस प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात त्यांनी हा अर्ज दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहू अर्जदारांच्या हक्काबददल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना/अर्जदारांना दुरूस्ती वारस प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख ३०/१०/२०२६ आहे.
आज रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.

कनिष्ठ लिपिक
दिवाणी न्यायालय,
क. स्तर, बीड

आदेशावरुन
स्वाक्षरित
**अधिक्षक,**
दिवाणी न्यायालय, व. स्तर,बीड

**जाहीर प्रगटन**

**मा.श्री. रिजवान उ.शेख ४ थे दिवाणी न्यायाधीश व. स्तर, बीड, ता. जि. बीड यांचे न्यायालयात किरकोळ दिवाणी अर्ज क. १५४७/२०२६ ॲड. काचमांडे यु. ए. पंडित व ईतर वि. निरंक**

ज्यापेक्षा शेषराव रामभाऊ येडे, हे दिनांक १८/०७/२०२५ रोजी, अंजनवती, ता. जि.बीड, येथे मयत झालेले आहेत, तसेच

अर्जदार १. पंडित पि. शेषराव येडे, वय. ५४ वर्षे, धंदा. शेती, रा. अंजनवती, ता. जि. बीड ह.मु. घर नं.४११, पेझारी, आंबेपुर, पोयनाड, रायगड, अलिबाग २. पंजाब पि. शेषराव येडे, वय. ५१ वर्षे, धंदा. शेती, रा. अंजनवती, ता.जि.बीड ३. सुरेखा भ्र.मोहन मंचुके, वय. ५५ वर्षे, धंदा. शेती, रा. आंबेपुर, पेझारी, पोयनाड, रायगड, अलिबाग ४. निलावती भ्र.शेषराव येडे, वय. ७७ वर्षे, धंदा. निरंक, रा. अंजनवती, ता.जि. बीड

अर्जदार क. १ व २ हे मयताचे मुले असुन, अर्जदार क. ३ ही मयताची विवाहीत मुलगी आहे. अर्जदार क. ४ ही मयताची पत्नी आहे. असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कांत मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे मयताचे वारस नव्हेत असे काणोस समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हा कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरह कोट, सदरहु अर्जदारांच्या हक्कांतबददल लागलीचं पुरावा घेवुन त्यांचा/अर्जदारांच्या हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना/अर्जदारांना सदरहु मयत नामे शेषराव रामभाऊ येडे, हे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख: ०४/११/२०२६ ही आहे.
आज दिनांक १९ सप्टेंबर २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्या निशी दिले.

कनिष्ठ लिपिक
दिवाणी न्यायालय,
व. स्तर, बीड

आदेशावरुन
स्वाक्षरित
**अधिक्षक,**
दिवाणी न्यायालय, व. स्तर,बीड

**जाहीर प्रगटन**

**मा. श्रीमती एस. आर. पाटील, सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पाटोदा, ता. पाटोदा, जि. बीड यांच्या न्यायालयात. किरकोळ दिवाणी अर्ज ४०२/२०२६ सुशीला व इतर विरुध्द निरंक मार्फत ॲड. ओ. एच. देशमुख**

अर्जदार :- १. सुशिला अहिलाजी कुचेकर, रा. माउलीनगर, ता. पाटोदा जि. बीड २. विलास अहिलाजी कुचेकर, रा. माउलीनगर, ता. पाटोदा जि. बीड ३. नितीन अहिलाजी कुचेकर, रा. माउलीनगर, ता. पाटोदा जि. बीड ४. ज्ञानदेव अहिलाजी कुचेकर, रा. माउलीनगर, ता. पाटोदा जि. बीड ५. सचिन अहिलाजी कुचेकर, रा. माउलीनगर, ता. पाटोदा जि. बीड

विरूध्द निरंक

मागणी अर्ज:-बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत..

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत अहिलाजी भिवराव कुचेकर, हे रा. माउलीनगर, ता. पाटोदा जि. बीड यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी अहिलाजी भिवराव कुचेकर, यांचा मृत्यु दिनांक २५/१२/२०२५ रोजी रा. माउलीनगर, ता. पाटोदा जि. बीड येथे मयत झाले आहेत. अर्जदार कं. १ ही मयताची पत्नी असून अर्जदार कं. २ व ५ हे मयताचे मुले आहेत. या व्यतिरिक्त मयतास कोणीही कायदेशीर वारसदार नाही.

वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरह अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत अथवा त्यांच्या व्यतिरीक्त इतर कोणी मयताचे वारस आहेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरह मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरह अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत अहिलाजी भिवराव कुचेकर, यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०७ ऑक्टोंबर २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. १७ नोव्हेंबर २०२६

स्वाक्षरित
कनिष्ठ लिपिक

आदेशावरुन
स्वाक्षरित
**अधिक्षक,**
दिवाणी न्यायालय, क. स्तर,बीड

जा. क्र- १९२७ दि-०१/१०/२०२६
जिल्हा तक्रार निवारण न्यायमंच बीड जिल्हा कार्यालय
शाहूनगर पांगरी रोड, बीड ४३११२२

**जाहीर प्रगटन**

CONSUMER CASE NO. DC/470/CC/469/2024
GORAKH DAMODHAR LAMBUD ....Petitioner/-ppellant
Versus
.....Opposite Party/Respondent(s)
To.
DNYANRADHA MULTISTATE CO-OP CREDIT SO.LTD
Opposite Party / Respondent Name:
1. DNYANRADHA MULTISTATE CO-OP CREDIT SO.LTD
DNY-NR-DH- MULTIST-TE CO-OP CREDIT SO.LTD DNYANRADH- BHAWAN, JALNA ROAD, BEED DISTT. BEED.431122, MAHARASHTRA BEED-
2. CHAIRMAN SURESH DNYANOBA KUTE DNYANRADHA MULTIST-TE CO-OP CREDIT SO.LTD NEAR CHADA FAKTI, M.I.D.C. BEED DISTT. BEED.431122, MAHARASHTRA BEED-
3. BRANCH MANAGER DNYANRADHA MULTISTATE CO-OP CREDIT SO.LTD NEAR WATER TANK, OLD MOND- MAJALGAON TQ. MAJALGAON DISTRICT BEED, M-H-R-SHTR- BEED-

वर नमुद तक्रारदार यांना विरुध्द पक्ष यांच्या विरुध्द ग्राहक संरक्षण कायद्यान्वये वर नमुद तक्रार दाखल केलेली आहे. यातील विरुध्द पक्ष यांना नोटीस पाठविली असता ते स्विकारत नाही / पत्ता बदल झाल्यामुळे मिळुन येत नाही. म्हणून तक्रारदारांनी केलेल्या विनंतीनुसार या जाहिर नोटीस व्दारे आपणास कळविण्यात येते की, विरुध्द पक्ष यांनी वर नमुद या आयोगाच्या पत्यावर दिनांक १८/११/२०२६ रोजी सकाळी १०:३० वाजता स्वता. अगर वकिल किंवा प्राधिकृत प्रतिनिधि मार्फत उपस्थित राहून आपला लेखी जबाब, पुरावा व प्रतिज्ञालेख दाखल करावेत. जर विरुध्द पक्षांनी याकामी कसूर केल्यास मा. आयोगाव्दारे एकतर्फा आदेश पारित करणेत येवुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची दखल घ्यावी. मा. जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड यांची आदेशानुसार.

दिनांक २९/०९/२०२६
ठिकाण - बीड

स्वाक्षरित
**प्रबंधक**
**जिल्हा ग्राहक तक्रार, निवारण आयोग, बीड.**

# महामार्गालगतच्या अतिक्रमणांवर बुलडोझर!

## जामखेडकरांच्या लढ्याला अखेर यश; पक्की घरेही जमीनदोस्त, जेसीबी-ब्रेकरच्या सहाय्याने कारवाई

**जामखेड । प्रतिनिधी**

जामखेड शहरातील महामार्गालगतच्या अतिक्रमणांविरोधात अखेर प्रशासनाने धडक मोहीम हाती घेतली असून, पक्की घरेही जेसीबी व ब्रेकरच्या सहाय्याने जमीनदोस्त करण्यात आली आहेत. गेल्या अनेक दिवसांपासून जामखेडकरांच्या संघर्षाचा आणि चर्चेचा विषय ठरलेल्या अतिक्रमण प्रश्नावर प्रशासनाने मंगळवारी प्रत्यक्ष हातोडा चालविला. बीड रोडवरील शासकीय दूध डेअरी परिसरापासून या कारवाईला सुरुवात करण्यात आली.

राष्ट्रीय महामार्गाच्या गटारापासून दोन्ही बाजूंना सुमारे तीन मीटर म्हणजेच दहा फूट अंतरातील अतिक्रमणे हटविण्यात येत आहेत.



या कारवाईत टपऱ्या, दुकाने आणि तात्पुरत्या स्वरूपाच्या अतिक्रमणांसोबतच महामार्गाच्या हद्दीत आलेली अनेकांची पक्की घरेही हटविण्यात आली. अतिक्रमण काढण्यासाठी जेसीबी, ब्रेकर आदी यंत्रसामग्रीचा वापर करण्यात येत असल्याने कारवाईला मोठा वेग आला आहे. महसूल प्रशासन, जामखेड नगरपरिषद, राष्ट्रीय महामार्ग विभाग, भूमिअभिलेख विभाग आणि पोलीस प्रशासनाच्या संयुक्त पथकाकडून ही मोहीम राबविण्यात येत आहे. कारवाईच्या वेळी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी अजय साळवे, पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी, महसूल विभागाचे अधिकारी तसेच भूमिअभिलेख विभागाचे अधिकारी उपस्थित होते. अनुचित प्रकार टाळण्यासाठी मोठा पोलिस बंदोबस्तही तैनात करण्यात आला आहे.

### पुढील टप्प्यात संपूर्ण शहरात कारवाई?

प्रशासनाने ही मोहीम केवळ बीड रोडपुरती मर्यादित न ठेवता शहरातील इतर भागांतील अतिक्रमणांवरही कारवाई करण्याची तयारी केली आहे. त्यामुळे आगामी काळात शहरातील विविध भागांमध्ये अतिक्रमण हटाव मोहीम राबविली जाण्याची शक्यता आहे.

शहरातील रस्ते मोकळे होऊन वाहतूक सुरळीत व्हावी, यासाठी सुरू झालेली ही कारवाई स्वागतार्ह असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. मात्र, अतिक्रमण हटविताना कोणताही भेदभाव न करता समान निकष आणि कायदेशीर प्रक्रिया पाळावी, अशी अपेक्षाही नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

### ही कारवाई जामखेडकरांच्या पाठपुराव्याचे यश

जामखेड शहरातील महामार्गालगतच्या अतिक्रमणाचा प्रश्न गेल्या अनेक दिवसांपासून जामखेडकरांच्या चर्चेचा आणि संघर्षाचा विषय होता. प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा, निवेदने, बैठका आणि आंदोलनाच्या माध्यमातून हा प्रश्न मांडण्यात आला. अखेर प्रशासनाने अतिक्रमण हटविण्याची प्रत्यक्ष कारवाई सुरू केली आहे. ही कारवाई म्हणजे जामखेडकरांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला मिळालेला सकारात्मक प्रतिसाद आहे. प्रशासनाने ही मोहीम निष्पक्षपणे आणि सातत्याने पुढे नेत महामार्ग मोकळा करून वाहतूक सुरळीत करण्याच्या दिशेने ठोस पावले उचलावीत, हीच अपेक्षा. - अवधूत पवार, सामाजिक कार्यकर्ते

### तीन वर्षांपासून रखडलेली मोहीम अखेर सुरू

जामखेड शहरातील महामार्गालगत मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे झाल्याने वाहतुकीला अडथळा निर्माण होत होता. रस्त्याच्या कडेला उभारलेल्या टपऱ्या, दुकाने तसेच बांधकामांमुळे मुख्य रस्त्यावर वारंवार वाहतूक कोंडी होत होती. महामार्गाच्या कामालाही अतिक्रमणांचा अडथळा निर्माण झाल्याने काम रखडले होते.या प्रश्नावर जामखेडकरांनी प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला. निवेदने, बैठका आणि आंदोलनांच्या माध्यमातून अतिक्रमण हटविण्याची मागणी लावून धरण्यात आली होती. अखेर प्रशासनाने कारवाई सुरू केल्याने जामखेडकरांच्या सातत्यपूर्ण लढ्याला यश आल्याची भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

---

# बीड शहराच्या पाणीपुरवठ्यासाठी आ.संदीप क्षीरसागर यांचे विशेष प्रयत्न

## अतिरिक्त वीज भार मंजूर करण्यासाठी प्रशासकीय पातळीवर वेग

बीड । प्रतिनिधी

बीड शहरासमोरील संभाव्य भीषण पाणीटंचाई लक्षात घेता, नागरिकांना सुरळीत पाणीपुरवठा व्हावा यासाठी आ.संदीप क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सततच्या पाठपुराव्यामुळे प्रशासकीय स्तरावर वेगाने हालचाली सुरू झाल्या आहेत. आ.क्षीरसागर यांच्या या यशस्वी पाठपुराव्याला आता मोठे यश आले असून, बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ मधील तरतुदींचा आधार घेत महावितरण कंपनीला पत्र लिहिले आहे. बीडमधील भीषण पाणीटंचाईवर मात करण्यासाठी काडीवडगाव येथे १५०० घत- आणि ईट येथे १३०० घत- चा एकूण आवश्यक अतिरिक्त वीज भार 'विशेष बाब' म्हणून तातडीने मंजूर करण्याबाबत जिल्हाधिकारी यांच्या स्तरावरून प्रशासकीय कार्यवाही करण्यात आली आहे. याबाबत जिल्हाधिकारी यांनी महावितरणकडे पत्रव्यवहार केला आहे.



बीड शहराची अंदाजे २,६५,००० लोकसंख्या असून शहराला दररोज ३६ दशलक्ष लीटर पाण्याची आवश्यकता भासते. आतापर्यंत यापैकी ८ दशलक्ष लीटर पाणीपुरवठा करणाऱ्या बिंदुसरा धरणातील पाणीसाठा अपुऱ्या पावसामुळे ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत संपुष्टात आल्याने, शहराची संपूर्ण भिस्त आता माजलगाव धरणावर अवलंबून आहे. माजलगाव धरणावरून पाणी उचलणाऱ्या काडीवडगाव येथील अशुद्ध पाणी उपसा केंद्र आणि पिंपळगाव मंजरा (ईट) येथील जलशुद्धीकरण केंद्राचा वीज भार वाढवणे अत्यंत आवश्यक होते. मात्र, बीड नगर परिषदेची आर्थिक परिस्थिती बिकट असल्याने व महावितरणची कोट्यवधी रुपयांची वीज बिल ◀◀ पान ३ वर

# विश्वकर्मा सुतार समाजावर उपासमारीची वेळ; प्रत्येकी ५० हजारांच्या आर्थिक मदतीची भाई मुंजा पांचाळ यांची मागणी

माजलगाव । प्रतिनिधी

दुष्काळ आणि आधुनिकतेच्या लाटेत लोखंडी अवजारांचा वाढलेला वापर यामुळे पारंपरिक लाकडी व्यवसायावर अवलंबून असलेल्या विश्वकर्मा सुतार समाजावर भीषण उपासमारीची वेळ आली आहे. ही परिस्थिती गंभीर असून, आत्महत्यांचे पाऊल उचलण्याची वेळ येण्यापूर्वी राज्य सरकारने दखल घेत महाराष्ट्रातील प्रत्येक सुतार कुटुंबाला ५० हजार रुपयांची आर्थिक मदत तातडीने जाहीर करावी, अशी आक्रमक मागणी शेतकरी कामगार पक्षाचे माजलगाव तालुका चिटणीस भाई मुंजा पांचाळ यांनी केली आहे.सुतार समाजाचे कुटुंब पिढ्यानुपढ्या लाकडी अवजारे (उदा. आऊत, तिफन, मोगडा, बैलगाडी, जु), घरांचे दरवाजे आणि चौकटी बनवण्याच्या पारंपरिक व्यवसायावर अवलंबून होते. शेतीमध्ये आणि इतर कामांसाठी लोखंडी अवजारांचा मोठ्या प्रमाणावर वापर सुरू झाल्यामुळे लाकडी अवजारांची मागणी पूर्णपणे संपुष्टात आली आहे. व्यवसायातून मिळणारे उत्पन्न बंद झाल्यामुळे कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा चालवावा, असा प्रश्न निर्माण झाला आहे.तीव्र आर्थिक विवंचनेमुळे कुटुंबासमोर मुलींच्या लग्नासारखे मोठे सामाजिक आणि आर्थिक प्रश्न आवासून उभे ठाकले आहेत. आर्थिक विवंचनेमुळे राज्यातील सुतार समाजातील कोणत्याही बांधवाने टोकाचे पाऊल (आत्महत्या) उचलू नये, यासाठी महाराष्ट्र शासनाने तातडीने मदतीचा हात पुढे करावा, असे आवाहन भाई मुंजा पांचाळ यांनी केले आहे.



---

# मेटे साहेबांचा वैचारिक वारसा डॉ. ज्योतीताई मेटे यांच्या भूमिकेतून पुढे

## शेतकरी, विद्यार्थी व सर्वसामान्यांच्या प्रश्नांवर अभ्यासपूर्ण आणि रोखठोक भूमिका

बीड । प्रतिनिधी

लोकनेते स्व.विनायकराव मेटे साहेबांचा वैचारिक वारसा, संघर्षाची परंपरा आणि रोखठोक नेतृत्वगुण डॉ. ज्योतीताई मेटे यांच्या सामाजिक व सार्वजनिक भूमिकेतून पुढे सुरू असल्याचे चित्र आहे. समाजातील विविध घटकांच्या प्रश्नांचा अभ्यास करून त्यावर सातत्याने भूमिका मांडण्याचे काम त्या करीत आहेत.

राज्यात दुष्काळाची परिस्थिती निर्माण झालेल्या पार्श्वभूमीवर 'ट्रिगर-१' अंतर्गत पात्र शेतकऱ्यांना



२५ टक्के अग्रिम पीकविमा तातडीने देण्यात यावा, तसेच सन २०२५ मधील अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांचा रखडलेला पीकविमा व आर्थिक मदत त्वरित वितरित करण्यात यावी, अशी मागणी डॉ. ज्योतीताई मेटे यांनी शासनाकडे केलेली आहे. शेतकऱ्यांच्या अडचणींचा केवळ राजकीय मुद्दा म्हणून विचार न करता त्यांच्या प्रत्यक्ष अडचणींना वाचा फोडण्याची भूमिका त्यांनी घेतली आहे.विनायकराव मेटे साहेबांनी समाजातील वंचित, शेतकरी, विद्यार्थी आणि सर्वसामान्य घटकांच्या प्रश्नांसाठी संघर्षाची भूमिका कायम ठेवली. त्याच विचारांची आणि दूरदृष्टीची छाप डॉ. ज्योतीताई मेटे यांच्या विविध अभ्यासपूर्ण भूमिकांमधून दिसून येते.

शेतकरी, विद्यार्थी तसेच सर्वसामान्यांच्या प्रश्नांवर सातत्याने आवाज उठविणाऱ्या डॉ. ज्योतीताई मेटे यांच्या या भूमिकेमुळे मेटे साहेबांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा प्रयत्न सुरू आहे. भविष्यात त्यांना संवैधानिक पदाची संधी मिळाल्यास त्यांच्या अभ्यासपूर्ण आणि संवेदनशील भूमिकेचा उपयोग समाजातील विविध घटकांच्या प्रश्नांच्या प्रभावी निराकरणासाठी होऊ शकतो, अशी अपेक्षाही व्यक्त केली जात आहे.

# जिल्हा परिषद शाळेत व्हिडीओ शुटिंग व शिक्षिकेचा विनयभंग; शिवाजी परभणेवर दोन गुन्हे दाखल

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा बांदखेल व दौलवडगाव अंतर्गत येणाऱ्या आनंदवाडी शाळेत बेकायदेशीरपणे व्हिडीओ शुटिंग करून शिक्षकांना धमकावणे आणि महिला शिक्षिकेशी गैरवर्तन करून विनयभंग केल्याप्रकरणी शिवाजी परभणे याच्यावर अंभोरा पोलीस ठाण्यात दोन वेगवेगळे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. स्थानिक गुन्हे शाखा बीड यांनीही त्याच्याविरुद्ध प्रतिबंधात्मक कारवाईचा गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, शिवाजी परभणे हा बांधखेल येथे महा-ई-सेवा केंद्र चालवतो.शिक्षक त्याच्याकडे काम करत नसल्याचा राग मनात धरून, गणेश विसर्जन मिरवणुकीसाठी विद्यार्थी गेले असताना बांदखेल शाळेतील मुख्याध्यापकांना दमदाटी करत त्याने व्हिडीओ तयार केला. त्यानंतर आनंदवाडी येथील शाळेत जाऊन मुख्याध्यापक सुरेश कुटे कार्यालयात असताना 'मुले कुठे आहेत' असा जाब विचारत व्हिडीओ शुटिंग केले.दुसऱ्या दिवशी पुन्हा आनंदवाडी शाळेत जाऊन त्याने सहशिक्षिका रोहिणी पाटील यांना मुख्याध्यापक कुटे यांच्यासमोर अर्वाच्य भाषेत बोलून दमदाटी केली. तुमचे अधिकारी माझ्यासमोर लटलट कापतात, तुझी नोकरी घालवीन अशी धमकी देत, रजिस्टर व अर्ज मागून धमकावले. न्यायालयाच्या आदेशानुसार त्रयस्थ व्यक्तीला शाळेत व्हिडीओ शुटिंग करण्याची परवानगी नसतानाही अशा प्रकारे त्रास दिला जात होता.

अखेर स्वाभिमानाशी तडजोड न करता शिक्षिका रोहिणी पाटील यांनी अंभोरा पोलिसांत तक्रार दाखल केली. त्यानुसार भारतीय न्याय संहिता कलम २२१,३५१(२), ३५२,७९ व ३(५) अंतर्गत गुन्हे नोंदवण्यात आले आहेत. मुख्याध्यापक सुरेश कुटे हेदेखील शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी तक्रार दाखल करणार आहेत. याशिवाय सेतू केंद्राच्या माध्यमातून ब्लॅकमेल करणे आणि त्याला फूस लावणाऱ्या स्थानिक घटकांबाबत आ. सुरेश धस, तहसीलदार आष्टी, जिल्हाधिकारी बीड,मुख्य कार्यकारी अधिकारी (जि.प. बीड) यांच्याकडे प्रत्यक्ष भेटून तक्रार करणार असल्याचे शिक्षिका रोहिणी पाटील यांनी सांगितले.

---

# बीडमध्ये रेशीम उद्योगाला मिळणार पायाभूत सुविधांचे बळ

## रेशीम पार्कसह आधुनिक ड्रायरचा प्रस्ताव; निधीसाठी शासनस्तरावर हालचाली

**बीड । विशाल साळुंके**

जिल्ह्यातील रेशीम उत्पादकांना स्थानिक बाजारपेठ आणि आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी बीड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात रेशीम पार्क उभारण्याच्या प्रस्तावाला रेशीम संचालनालयाने तत्त्वतः मंजुरी दिली आहे. प्रकल्पासाठी निधी मंजुरीची प्रक्रिया वरिष्ठ स्तरावर सुरू असून आधुनिक ड्रायर सुविधेसह रेशीम कोष बाजारपेठ विकसित करण्याचे नियोजन करण्यात येत आहे, अशी माहिती छत्रपती संभाजीनगर विभागाचे उपसंचालक डॉ. महेंद्र ढवळे यांनी बुधवारी दिली.

डॉ. महेंद्र ढवळे यांनी बीड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कै. विनायकराव मेटे रेशीम कोष खरेदी केंद्राला भेट देऊन रेशीम उत्पादक शेतकऱ्यांशी संवाद साधला. उत्पादन, कोष विक्री, बाजारपेठ तसेच शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणींची त्यांनी माहिती घेतली. प्रस्तावित रेशीम पार्कसाठी बाजार समितीच्या आवारातील जागा आणि उपलब्ध सुविधांचाही त्यांनी आढावा घेतला.

बीड कृषी उत्पन्न बाजार समितीला २०१८ मध्ये रेशीम कोष बाजारपेठ सुरू करण्यास परवानगी



मिळाली होती. बाजार समितीने जागा आणि आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिल्याने जिल्ह्यातील रेशीम उत्पादकांना कोष विक्रीसाठी स्थानिक बाजारपेठ मिळाली. त्यामुळे जिल्ह्यातील रेशीम उत्पादनाला चालना मिळाली. स्वतंत्र रेशीम पार्क उभारण्याची मागणी गेल्या सुमारे चार वर्षांपासून केली जात आहे.

रेशीम कोष खरेदीनंतर त्यांची सुरक्षित साठवणूक आणि वाळवणुकीसाठी आधुनिक ड्रायरची आवश्यकता आहे. त्यासाठी राष्ट्रीय कृषी विकास योजना किंवा केंद्र सरकारच्या सिल्क समग्र योजनेअंतर्गत बीड बाजार समितीला ड्रायर उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव तयार केला जाणार आहे. हा प्रस्ताव पीएमसीमार्फत पाठविण्यात येणार असल्याचे डॉ. ढवळे यांनी सांगितले.

रेशीम पार्कसाठी मराठवाडा विकास कार्यक्रम किंवा जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून अर्थसहाय्य मिळविण्याची शक्यता आहे. यासाठी जागा निश्चित करून खर्चाचा अंदाज तयार केला जाणार आहे. त्यानंतर प्रस्ताव उच्चस्तरीय समिती आणि मंत्रालयाकडे पाठविला जाणार आहे. केंद्र सरकारचा ५० टक्के, राज्य सरकारचा २५ टक्के आणि बीड कृषी उत्पन्न बाजार समितीचा २५ टक्के सहभाग असलेल्या संयुक्त प्रकल्पाचा विचारही करण्यात येणार आहे.

बाजार समितीच्या स्वतःच्या जागेवर जालना आणि सोलापूरच्या धर्तीवर दर्जेदार पायाभूत सुविधा उभारून रेशीम बाजारपेठ विकसित करण्याचे नियोजन आहे. रेशीम पार्क आणि आधुनिक ड्रायर सुविधा उपलब्ध झाल्यास कोषांची सुरक्षित हाताळणी, साठवणूक आणि विक्री सुलभ होण्यास मदत होणार आहे. कमी पाणी आणि तुलनेने कमी खर्चात उत्पन्न मिळवून देणारा रेशीम उद्योग दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचा पर्याय ठरत असल्याने या प्रकल्पामुळे जिल्ह्यातील रेशीम उत्पादनाला आणखी चालना मिळण्याची अपेक्षा आहे.

# बीड पोलिसांनी तीन वर्षांत मिळवून दिले २,२४० हरवलेले मोबाईल!

बीड । प्रतिनिधी

मोबाईल हरवला किंवा चोरीला गेला तर तो परत मिळणे कठीण, हा समज आता बीड पोलिसांनी पूर्णपणे खोटा ठरवला आहे! भारत सरकारच्या दूरसंचार विभागाच्या प्रणालीचा प्रभावी वापर करत बीड जिल्हा पोलिसांनी गेल्या तीन वर्षांत तब्बल २,२४० मोबाईल शोधून ते नागरिकांना सुपूर्द केले आहेत. विशेष म्हणजे, या कामगिरीच्या जोरावर बीड जिल्हा पोलीस दल गेल्या दोन वर्षांपासून राज्यात सातत्याने अव्वल दहामध्ये राहिले आहे.

वर्षनिहाय कामगिरीचा आलेख:सन २०२४: १२४ मोबाईल नागरिकांना परत मिळाले.

सन २०२५: ७८६ मोबाईल शोधून नागरिकांना परत केले.

सन २०२६ (सप्टेंबरअखेर): तब्बल १,३३० मोबाईल शोधण्यात यश आले.

◀◀ पान ३ वर




This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26